
**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०




सामाहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक १६ | बुधवार, दि.२५ ते ३१ मार्च २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## बस्तरमधील अखेरच्या माओवादी कमांडरची छत्तीसगड पोलिसांसमोर शरणागती



**रायपूर(वृत्तसंस्था) :** देशातून डाव्या विचारसरणीचा अतिरेकीपणा पूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी निश्चित केलेल्या ३१ मार्चच्या अंतिम मुदतीला नेमका एक आठवडा बाकी असतानाच, बस्तरमधील माओवाद्यांचा शेवटचा उरलेला कमांडर मंगळवारी छत्तीसगड पोलिसांसमोर शरणागती पत्करण्यास सज्ज झाला आहे. सुनाम चंद्रया अशी ओळख असलेला, परंतु पोलिसांच्या दप्तरी "पापा राव' या नावाने नोंद असलेला हा कमांडर; "भारतीय कम्युनिस्ट पक्ष (माओवादी)' या संघटनेच्या दंडकारण्य क्षेत्रातील जिवंत असलेला शेवटचा माओवादी कमांडर आहे.तो आपल्या १७ साथीदारासंह इंद्रावतीच्या जंगलातून शहराकडे निघाला असून त्याच्यावर २५ लाखाचे सरकारने बक्षिस ठेवले होते.पापा रावच्या शरणागतीनंतर बस्तर भागात फक्त ५० माओवादी उरल्याची शंका असून ते नेतृत्वहीन असल्याचे बोलले जाते.

राज्य विभागीय समितीचा सदस्य आणि पश्चिम बस्तर विभागाचा प्रभारी असलेल्या पापा रावची ही शरणागती, या बंदी घातलेल्या संघटनेच्या सशस्त्र संघर्षाला बसणारा अंतिम धक्का ठरू शकते, असे गुप्तचर आणि पोलीस सूत्रांनी सांगितले. "यासाठीची पूर्वतयारी आधीच पूर्ण झाली आहे; आता त्याची शरणागती ही केवळ एक औपचारिकता उरली आहे. सध्या सुरू असलेल्या घडामोडींच्या विरोधात काही अत्यंत अनपेक्षित घटना घडल्यास अपवाद, अन्यथा पापा राव वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आपली शस्त्रे खाली ठेवून शरणागती पत्करेल आणि मुख्य प्रवाहात सामील होईल," असे छत्तीसगड पोलिसांमधील एका सूत्राने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. बस्तरमधीलच शेजारच्या सुकमा जिल्ह्याचा मूळ रहिवासी असलेला पापा राव, इंद्रावती राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात सक्रिय होता; मात्र सध्या त्याच्याकडे असलेल्या कार्यकर्त्यांची संख्या अभूतपूर्वरित्या रोडावली होती, असेही सूत्रांनी पुढे सांगितले.

पापा रावने आपल्या शरणागतीची योजना खरोखरच निश्चित केली आहे का, असे विचारले असता, बस्तर विभागाचे पोलीस महानिरीक्षक सुंदरराज पट्टिलिंगम यांनी सांगितले की, या बंदी घातलेल्या संघटनेचे भूमिगत अवस्थेत असलेले मोजकेच उरलेले कार्यकर्ते आणि नेत्यांसाठी आता वेळ संपत आली आहे.


"त्यांच्याकडे आता फारसे पर्याय उरलेले नाहीत. आता त्यांनी पुढे येऊन शरणागती पत्करण्याची आणि सरकारच्या "शरणागती व पुनर्वसन धोरणाफ्चा लाभ घेण्याची वेळ आली आहे," असे बस्तरचे पोलीस महानिरीक्षक पुढे म्हणाले. मंगळवारी होणारी पापा रावची ही अटळ शरणागती, सशस्त्र माओवादी चळवळीच्या इतिहासातील आणि दंडकारण्य क्षेत्रातील त्यांच्या अस्तित्वाच्या संदर्भातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे; दंडकारण्य हे क्षेत्र एकेकाळी या बंदी घातलेल्या संघटनेचा मुख्य तळ मानले जात असे.

आंध्र प्रदेश पोलिसांनी सुरू ठेवलेल्या सातत्यपूर्ण मोहिमांमुळे, १९८० च्या दशकाच्या सुरुवातीला माओवादी या दंडकारण्य क्षेत्रात स्थलांतरित झाले होते. छत्तीसगड पोलीस आणि गुप्तचर यंत्रणेतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या क्षेत्रात सुरक्षा दलांवर माओवाद्यांनी केलेल्या सर्व मोठ्या हल्ल्यांचा पापा राव हाच मुख्य सूत्रधार राहिला आहे. "तो डीकेएसझेडसीचा माजी सचिव रावुला श्रीनिवास ऊर्फ "रामन्ना' याचा उजवा हात होता. रामन्ना हा या भागातील सर्वात क्रूर माओवादी नेत्यांपैकी एक होता; त्याने गनिमी कावे आणि आयइडीज (स्फोटके) यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करून जंगलांवर आपले वर्चस्व गाजवले होते," असे छत्तीसगड पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

छत्तीसगड पोलीस दलातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन मोठ्या धक्क्यांमुळे रावची ताकद क्षीण झाली होती: या वर्षी जानेवारीमध्ये त्याचा प्रमुख सहकारी दिलीप बेडजा जो त्याच्यासाठी रसद पुरवठा आणि स्थानिक मदतीसाठी अत्यंत महत्त्वाचा दुवा होता.याची झालेली हत्या; आणि गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये त्याची पत्नी उर्मिला जी स्वतः दंडकारण्य विशेष क्षेत्रीय समितीची (डीकेएसझेडसी) सदस्य होती,तिची झालेली हत्या. विजापूर येथे सुरक्षा दल आणि माओवादी कैडर्स यांच्यात झालेल्या चकमकीत बेडजा मारला गेला होता; या चकमकीच्या वेळी राव स्वतः तिथे उपस्थित होता. मात्र, तो सुदैवाने सुखरूप निसटण्यात यशस्वी झाला होता.

## लोकसभेत मतदारसंघांची संख्या थेट ८१६ वर, महाराष्ट्रातूनही ४८ ऐवजी ७२ खासदार

**नवी दिल्ली :** चार राज्यांमधील विधानसभा निवडणुकांसाठीचा प्रचार जोर धरत असतानाच लोकसभा मतदारसंघांची फेररचना करण्याच्या हालचाली सुरु आहेत. २०२९ ची लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये महिलांना एक तृतीयांश जागांवर आरक्षण लागू करण्याच्या उद्देशाने घटनादुरुस्त्यांसह किमान दोन विधेयकं संसदेच्या चालू अधिवेशनात मांडण्याचा मोदी सरकारचा विचार आहे. या निर्णयामुळे देशाचं राजकीय चित्रच बदलण्याची चिन्हं आहेत. सोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ममहिला सक्षमीकरणफ या अजेंड्यावरही बळकट मोहोर उमटण्याची शक्यता आहे.



बहुमताचा आकडाही वाढणार केंद्र सरकारच्या योजनेनुसार कार्यवाही झाली, तर लोकसभेतील जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरुन ५० टक्क्यांनी वाढून ८१६ पर्यंत पोहोचेल. या वाढीव २७३ जागा केवळ महिलांसाठी राखीव ठेवल्या जातील. जेणेकरुन जेव्हा ही नवीन रचना अंमलात येईल, तेव्हा सध्याची राजकीय समीकरणं आणि पुरुषांचं प्रमाण प्रचंड असलेल्या विद्यमान खासदारांना अचानक बाजूला सारलं जाणार नाही. त्यानुसार बहुमताचा आकडा ४०९ वर पोहोचेल. तर महाराष्ट्रातील जागाही ४८ वरुन ७२ वर पोहोचतील.

गेल्या पाच दशकांहून अधिक काळात प्रथमच लोकसभेची सदस्यसंख्या वाढणार आहे. राज्यसभा आणि राज्यांमधील विधान परिषदांच्या सदस्यसंख्येवर मात्र याचा कोणताही परिणाम होणार नाही.

किमान दोन विधेयके मांडली जातीलड्डत्यापैकी एक मतदारसंघ पुनर्रचनेशी (**delimitation**) संबंधित असेल, तर दुसरे संविधानातील दुरुस्तीसाठीचे असेल. या दोन्ही विधेयकांच्या मंजुरीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता असेल.

सत्ताधारी एनडीएकडे हे विधेयक केवळ स्वतःच्या बळावर मंजूर करुन घेण्याइतपत संख्याबळ नसलं, तरी ४ एप्रिल रोजी संपणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान हे विधेयक मंजूर करुन घेण्यासाठी सरकार आग्रही असल्याचं दिसून येतं. तसं शक्य न झाल्यास केवळ महिला आरक्षणाच्या मुद्द्यासाठीच एक विशेष (अल्पकालीन) अधिवेशन बोलावण्याच्या पर्यायाचा विचारही सरकार करु शकतं.

## ११ माओवाद्यांनी सोडले शस्त्र, सव्वा वर्षात १२३ जण शरण

**गडचिरोली :–** माओवादग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात(दि.१९) ५ वरिष्ठ माओवाद्यांसह एकूण ११ माओवाद्यांनी शस्त्रत्याग करत पोलिसांपुढे शरणागती पत्करली. त्यांच्यावर एकूण ६८ लाख रुपयांचे बक्षीस होते. पोलीस आणि सीआरपीएफ यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे सन २०२५ पासून आतापर्यंत, म्हणजे सव्वा वर्षात १२३ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केल्यामुळे गडचिरोली जिल्ह्यात नक्षल चळवळ आता संपुष्टात येण्याच्या मार्गावर आली आहे. पोलिसांच्या रेकॉर्डनुसार आता जिल्ह्यात केवळ ६ माओवादी शिल्लक राहिले आहेत. येत्या ३१ मार्चपर्यंत ते सर्वजण शरण येतील, असा विश्वास पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी व्यक्त केला.

कधीकाळी गडचिरोली जिल्ह्यातील १० उपविभागात सक्रिय असणारी माओवाद चळवळ आता फक्त भामरागड उपविभागाच्या छत्तीसगडकडील सीमावर्ती भागापुरती मर्यादित राहिली आहे. शासनाने सन २००५ पासून जाहीर केलेल्या आत्मसमर्पण योजनेमुळे, तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळून गेल्या २० वर्षात ७९४




माओवाद्यांनी चळवळीचा त्याग करून सामान्य जीवन जगणे पसंत केले आहे. त्यात अनेक वरिष्ठ आणि जहाल माओवाद्यांचा समावेश आहे. आत्मसमर्पित माओवाद्यांचे पोलीस दलाकडून पुनर्वसन घडवून आणले जात असल्यामुळे त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाल्याचे दिसून येत आहे. त्यातूनच गेल्या दोन वर्षात आत्मसमर्पण करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. (अधिक बातमी खाली वाचा)

गुरूवारी आत्मसमर्पण करणाऱ्या ११ जणांमध्ये सोनी ऊर्फ बाली वत्ते मट्टामी (डिव्हीसीएम– कुतुल दलम), बुदरी ऊर्फ रामबत्ती आयतु मट्टामी (एरीया कमिटी सचिव – इंद्रावती एरीया कमिटी), सुखलाल बोळगा कोक्सा (कमांडर– पश्चिम ब्युरो सप्लाय टीम), शांती ऊर्फ सोमरी गंगा तेलामी (पिपीसीएम – पश्चिम ब्युरो सप्लाय टीम), मिनको ऊर्फ जमनी काया मट्टामी (सदस्य – कंपनी क्र.१०), सुनिता ऊर्फ वंगे वत्ते होयाम (सदस्य – सँड्रा दलम), रमेश पांडू मडावी (सदस्य – मोबाईल पोलिटीकल स्कुल), किशोर सुक्रैय्या वासम (मिलिशीय कमांडर – सँड्रा दलम) अशा छत्तीसगडमधील रहिवासी असलेल्या ८ जणांसह गडचिरोली जिल्ह्यातील रहिवासी यमुनक्का ऊफ रुखमाक्का पोट्टी पेंदाम (एसीएम – भामरागड दलम), रा.गुड्डीगुडम, ता.अहेरी, गणेश उलगे कोवासी (सदस्य – कंपनी क्र.१०), रा.हिक्केर, ता.एटापल्ली आणि धनु दसरु वेळंजे (सदस्य – कंपनी क्र.१०), रा.ताडगाव, ता.भामरागड यांचा समावेश आहे.

## श्रीरामपुरात नागरिकांना टँकरच्या पाण्याचा आधार

**गोंदिया**–तलावांचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्याला उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागत आहे. जिल्हा मुख्यालयापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या गोरेगाव नगरपंचायत क्षेत्रात येणाऱ्या श्रीरामपूर येथे पाणीटंचाईने उग्र रूप धारण केले आहे.

पाणीपुरवठ्यासाठी मंजूर असलेल्या नळजोडणीच्या अर्धवट कामामुळे येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. दरम्यान, गेल्या तीन दिवसांपासून नगरपंचायतकडून या परिसरात टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत असून येथील नागरिकांना टँकरच्या पाण्यावर तहान भागवावी लागत आहे.

गोरेगाव तालुक्यातील कलपाथरी मध्यम प्रकल्पाच्या निर्मितीदरम्यान परिसरातील चार गावांचे पुनर्वसन गोरेगाव नगरपंचायत क्षेत्रात श्रीरामपूर म्हणून करण्यात आले. गेल्या २० ते २५ वर्षांपासून चारही गावांतील प्रकल्पग्रस्त या भागात राहतात. असे असले तरी जवळपास ८०० लोकसंख्या असलेल्या पुनर्वसित नागरिकांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. त्यात पाणी पुरवठ्याच्या नावावर केवळ ६ विंधन विहिरींसह ५ सार्वजनिक विहिरींची निर्मिती करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, जलजीवन मिशनअंतर्गत या परिसरात पाईप लाईनच्या कामाला सुरुवात करण्यात आली. मात्र, गेल्या दीड वर्षापासून हे काम संथगतीने सुरू आहे. परिणामी, उन्हाळ्याची चाहूल लागताच परिसरात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. यावर उपाययोजना म्हणून, गोरेगाव नगरपंचायत प्रशासनाने टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे आता श्रीरामपूरवासी आपली तहान भागवण्यासाठी टँकरवर अवलंबून आहेत.

गेल्या तीन दिवसांपासून श्रीरामपुरात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून टँकरच्या पाण्यावर कधीपर्यंत तहान भागवायची, असा प्रश्न श्रीरामपूर येथील नागरिक विचारत आहे. प्रशासनाने पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाईप लाईनचे काम त्वरित पूर्ण करून परिसरात नळ योजना सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

## जनगणनेसाठी ओबीसींचा एल्गार,स्वतंत्र मंत्रालयाची मागणी

**सकल ओबीसी महामोर्चा समितीचे आयोजन, घोषणांनी दणाणला परिसर**



### डीएनएचे नाव सांगणाऱ्या सरकारचं ढोंग

**श्री. वडेट्टीवार यांनी यावेळी सरकारवर जोरदार टीका केली. पंतप्रधानांनी स्वतः पार्लमेंटमध्ये ओबीसीची स्वतंत्र जनगणना करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आता सुरू होणाऱ्या जनगणनेच्या कामात ओबीसींचा स्वतंत्र कॉलम नाही. ते ओबीसींच्या डीएनएचे नाव सांगणाऱ्या सरकारचं ढोंग आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. जोपर्यंत स्वतंत्र रकाना दिला जात नाही, तोपर्यंत सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन सुरूच राहील, असेही त्यांनी नमूद केले.**

**भंडारा :–** जय ओबीसी, जय संविधान, ओबीसी एकता जिंदाबाद, ऊठ ओबीसी जागा हो, आंदोलनाचा धागा हो, आदी दणाणून सोडणाऱ्या घोषणा देत दसरा मैदानावरून सकल ओबीसी महामोर्चाच्या नेतृत्वात ओबीसींचा भव्य महामोर्चा रविवारी दुपारी निघाला. दूरवरील गावखेड्यातील नागरिकांसमवेत विविध शहरांतील नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. महिलांसह वृद्ध, तरुण–तरुणीही रखरखत्या उन्हात हाती फलक व गळ्यात पिवळा दुपट्टा घालून एकतेचा व समतेचा आवाज उंचावताना दिसल्या, प्रत्येकाच्या तोंडी ओबीसींची जनगणना झालीच पाहिजे, युजीसी समता विधेयक लागू करा, ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रालय सुरू करावे, हा नारा होता.

सकाळी ११ वाजता दसरा मैदानावरून निघालेला मोर्चा गांधी चौक–पोस्ट ऑफिस चौकाने मार्गस्थ होत जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील त्रिमूर्ती चौकात धडकला. तेथे मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. यावेळी मंचावरील ओबीसी संघटनांच्या पुढाऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या ओबीसी विरोधी धोरणांचा खरपूस समाचार घेतला.

सत्ताधारी रंग बदलणाऱ्या सरड्यासारखे असून, यांचा डीएनए कधीच ओबीसींचा नव्हता व राहणार नाही, अशी टीका केली. हे सरकार कुत्र्यांची व गाढवांची प्रगणना करते, परंतु ओबीसींची करीत नाही. ओबीसींची मुले शिक्षणापासून वंचित राहून गुलामीत व गुरेढोरे राखीत शेतातच मरावे, अशी विकृत मानसिकता राज्यकर्त्यांची असल्याचा प्रहार यावेळी करण्यात आला. ओबीसींनो, एक कायम लक्षात ठेवा जे ओबीसींना सहकार्य करतात, त्यांनाच निवडणुकीत सहकार्य करा, असे जाहीर आवाहनही याप्रसंगी करण्यात आले.

या मोर्च्याचे नेतृत्व ओबीसी संघर्ष कृती समिती भंडारा व सकल ओबीसी महामोर्चाचे बाळकृष्ण सार्वे, रोशन उरकुडे, उमेश कोर्राम, सदानंद इलमे, प्रभाकर वैरागडे, गोपाल सेलोकर, जयंत झोडे, संजय मते, रमेश शहारे, रोशन जांभुळकर, मंगला वाळीभस्मे, ललीता देशमुख, वृंदा गायधनी, लता बोरकर, भावना निकुडे, सुभदा झंझाड, आशिष बागडे, मनोज बोरकर, वामदराव वझाडे, गोपाल देशमुख, रामकृष्ण इलमे,अमरकंठ बाळेबुचे, बाबुराव मते आदिंनी केले.



### जनगणनेवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन

**ओबीसी जनगणना होत नसेल तर संपूर्ण समाजाने जनगणनेवर बहिष्कार घालावे, घरी आलेल्या प्रगणकास माहिती देऊ नये, असे जाहीर आवाहन याप्रसंगी करण्यात आले. देशात ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्केपेक्षा अधिक असताना जाणीवपूर्वक तुटपुंजा निधी मंजूर केला जातो. त्यामुळे ओबीसींची जनगणना होत नाही, तोपर्यंत ओबीसींचा लढा सुरू ठेवण्याचा निर्धार एकमताने जाहीर करण्यात आला. त्याला यासोबतच भविष्यकालीन आंदोलनाचा पुढील टप्पा सुरू करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला**

### या लोकप्रतिनिधींचा सहभाग

**सकल ओबीसी महामोर्चाच्या वतीने यावेळी मंचावर कोणत्याही पक्षाच्या नेत्यांना स्थान देण्यात आले नाही. हातात ओबीसींचा झेंडा व डोक्यावर पिवळी टोपी परिधान करीत ओबीसी योद्धांसारखे विरोधी पक्षनेते आ. विजय वेडेट्टीवार, आ. नाना पटोले, आ. अभिजित वंजारी, माजी आ. चरण वाघमारे, सभापती नरेश ईश्वरकर, काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्ष जयश्री बोरकर आदी लोकप्रतिनिधी नागरिकांमध्ये ठाण मांडून शेवटपर्यंत बसले होते.**




### शैक्षणिक आरक्षणाच्या मागण्या

**केवळ जनगणनाच नाही, तर ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतीबाबतही या मोर्चात आक्रमक पवित्रा घेण्यात आला. सध्या ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणारी ५० टक्के फी सवलत अपुरी असून ती १०० टक्के करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. अनेक गरीब ओबीसी विद्यार्थी फी अभावी उच्च शिक्षणापासून वंचित राहत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. तसेच, मूळ ओबीसी आरक्षणात होत असलेल्या इतर घटकांच्या घुसखोरीमुळे ओबीसींवर अन्याय होत असून, आरक्षणाची मर्यादा वाढवून समाजाला न्याय देण्याची मागणी करण्यात आली**

## काँग्रेस- 'वंचित'चा संघाविरोधात हल्लाबोल

**नागपूर:–**एपस्टिन फाइलमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सरकारमधील मंत्री हरदीपसिंग पुरी यांचे नाव आल्याचा आरोप करीत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेतली. या प्रकाराचा निषेध करीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पंतप्रधान मोदींकडून राजीनामा घ्यावा अशी मागणी करत सोमवारी संघ कार्यालयावर मोर्चा काढला. दरम्यान पोलिसांनी संघ कार्यालयावर मोर्चाला परवानगी नाकारल्याने मॉरिस कॉलेज वाय पॉइंटवरच मोर्चाचा समारोप झाला.

संविधान चौकात झालेल्या सभेला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर, काँग्रेसचे शहराध्यक्ष व आमदार विकास ठाकरे, वंचितचे नेते हर्षवर्धन पुंडकर, आमदार साजिद खान पठाण, माजी मंत्री अनिस अहमद, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस सुरेश भोयर, वंचितचे सुजात आंबेडकर यांच्यासह दोन्ही पक्षाचे नेते व पदाधिकारी उपस्थित होते. मोर्चापूर्वी झालेल्या सभेत हर्षवर्धन

सपकाळ म्हणाले, एपस्टिन फाइलमध्ये जगभरात ज्यांची नावे आली त्यांनी राजीनामे दिले आहेत तर काहींना अटकही करण्यात आलेली आहे. पण भारतात मात्र अद्याप काहीच कारवाई झालेली नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामुळे पंतप्रधान झालो, असे मोदी सांगत असतात. संघ नेहमीच संस्कृती व नैतिकतेबद्दल बोलत असतो, त्याच नैतिकतेच्या आधारे संघाने नरेंद्र मोदींचा

राजीनामा घ्यावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.



### काँग्रेस नेते,कार्यकर्त्यांची अनुपस्थिती

**मोर्चाला वंचितच्या तुलनेत काँग्रेसच्या नेतेमंडळी व कार्यकर्त्यांची अगदी नगण्य अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली. मुंबईत सुरू असलेल्या विधीमंडळ अधिवेशनामुळे आमदार विकास ठाकरे वगळता शहर व इतर जिल्ह्यातील एकही बडा काँग्रेस नेता उपस्थित नव्हता. त्यामुळे अनेक चर्चांना उधाण आले होते.**

### पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

**संघ मुख्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याने पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. काँग्रेस व वंचित अशा दोन्ही पक्षांच्या माध्यमातून हा मोर्चा असल्याने मोठी गर्दी होईल अशी अपेक्षा होती. त्यातच मोर्चाला केवळ मॉरिस वाय पॉइंट पर्यंतच परवानगी देण्यात आली होती. दरम्यान, खबरदारी म्हणून टेकडी रोडपर्यंत चोख बंदोबस्त ठेवण्यात आला.**



ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले, केंद्रातील भाजपाचे सरकार अमेरिकेच्या दबावाखाली काम करत आहे. भारतीय मालावर अमेरिकेने १८ टक्के कर लावला आहे. पण अमेरिकेच्या मालावर भारतात शून्य टक्के कर आहे, हा प्रकार भारताला गुलाम बनवण्याचा आहे. देशाचा स्वाभिमान अमेरिकेला विकणे, देशाला गुलाम बनवणे ही मोदींची राष्ट्रभक्ती आहे का? अशी टीकाही त्यांनी यावेळी केली. काँग्रेस व वंचितची विचारधारा वेगळी आहे पण देशाच्या प्रश्नावर आम्ही एकत्र आलो आहोत. जिल्हास्तरावर वंचितच्यावतीने अशा मोर्चांचे आयोजन करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. सभेनंतर निघालेल्या मोर्चाचा मॉरिस टी पॉइंट चौकात समारोप झाला. यावेळी पंतप्रधान मोदी, संघाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

## संपादकीय

# विदर्भ साहित्य संघाचा नवा अध्याय

विदर्भातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित अशा विदर्भ साहित्य संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीत डॉ. गिरीश गांधी यांची अध्यक्ष पदी निवड झाली असून त्यांच्या पॅनलने बहुमत मिळवले आहे. नव्या नेतृत्वासमोर संस्थेची सांस्कृतिक परंपरा पुनर्स्थापित करणे आणि पारदर्शक कारभार उभा करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

गेल्या दीड महिन्यापासून विदर्भात गाजत असलेल्या विदर्भ साहित्य संघाची पंचवार्षिक निवडणूक अखेर पार पडली. या निवडणुकीने गेले काही दिवस संपूर्ण विदर्भाचे सांस्कृतिक आणि साहित्यिक वातावरण पूर्णतः ढवळून टाकले होते. गेल्या शनिवारी पोस्टाने मतपत्रिका पाठवण्याचा अखेरचा दिवस होता. रविवारी सकाळपासून मतमोजणी सुरू झाली आणि सोमवारी रात्रीपर्यंत सर्व निकाल जाहीर झाले आहेत.

अपेक्षेनुसार सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील एक मान्यवर नाव असलेले डॉ. गिरीश गांधी हे विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले, तर कार्यकारिणीच्या २२ जागांवर गिरीश गांधींच्या पॅनलपैकी २१ उमेद–वार विजयी झाले. विदर्भ साहित्य संघ ही विदर्भातील सर्वात जुनी साहित्यिक संघटना असून ती आता १०३ वर्षांची झालेली आहे. या संघटनेचे नेतृत्व आतापर्यंत अनेक मान्यवर सारस्वतांनी केलेले असून या संघटनेला त्यांनीच एक वाङमयीन चेहरा देखील दिलेला होता. त्यात प्राचार्य राम शेवाळकर, प्रा. सुरेश द्वादशीवार, डॉ. मधुकर आष्टीकर, डॉ. वि. भी. कोलते, कवी अनिल, कवी भवानीशंकर पंडित, कवयित्री कुसुमावती देशपांडे अशा अनेक मान्यवरांचा समावेश आहे. मात्र गेल्या ३५ वर्षांपासून ही संस्था कायम वादाच्या भोवऱ्यातच सापडलेली आहे.

विदर्भ साहित्य संघाचे काम संपूर्ण विदर्भात अगदी खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलेले आहे. लहान लहान खेड्यांमध्ये देखील साहित्य संघाच्या शाखा सुरू झालेल्या आहेत. तिथे काही ना काही साहित्य कार्यक्रम कायम होतच असतात. त्यामुळे संपूर्ण विदर्भाची प्रातिनिधिक साहित्य संस्था म्हणून ही ओळखली जाते. त्यामुळेच ही निवडणूक संपूर्ण विदर्भात चर्चेचा विषय ठरणे स्वाभाविकच आहे. या संस्थेचे काम बघून जुन्या मध्य प्रांत (सेंट्रल प्रॉव्हिन्स अँड बेरार) सरकारने संस्थेला अगदी मोक्याच्या जागी एक भूखंड दिला होता. तिथे संस्थेने सुसज्ज अशी इमारत आणि एक भव्य असे रंगमंदिरही उभारले होते. मात्र १९९४–९५ मध्ये तत्कालीन कार्यकारिणीने ही इमारत जुनी झाल्याचे कारण देत आणि पुनर्विकासाचा प्रकल्प सदस्यांसमोर मांडत मंजुरी घेऊन पाडली आणि तिथे व्यावसायिक संकुल उभे केले. त्या संकुलाची इमारत आज तीस वर्षे झालीत, तरी पूर्ण झालेली नाही. म्हणजेच व्यावसायिक गाळे पूर्ण करून ते विकलेदेखील गेले, पण तिथे होणार असलेले रंगमंदिर आज तीस वर्षे झाली तरी पूर्ण झालेले नाही. त्यात गेली वीस वर्ष साहित्यिक नसलेल्या व्यक्तींकडे या संघटनेचे नेतृत्व राहिले आहे. त्यामुळे इथल्या साहित्यिक गतीविधी देखील थांबल्या आहेत. मधली वीस वर्षे इथे बिनविरोध निवडणुका होत होत्या. यावेळी प्रथमच चार पॅनल्स रिंगणात उतरले. त्यात दोन साहित्यिक तर दोन गैर साहित्यिक अध्यक्ष पदासाठी रिंगणात होते. त्यातील साहित्याशी काहीही संबंध नसलेले व्यावसायिक आणि राजकीय नेते डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. त्यावरून निवडणूक प्रक्रियेत तर बरेच वाद झाले, पण नंतरही आता बरेच वाद होणार हे चित्र स्पष्ट दिसत आहे.

डॉ. गिरीश गांधी हे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे उमेद–वार म्हणून ओळखले जातात. सुरुवातीच्या काळात गांधी हे शाळेत शिक्षक होते. तेव्हा नितीन गडकरी त्यांचे विद्यार्थी होते. परिणामी दोघांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यामुळे भाजपचा या निवडणुकीत हस्तक्षेप आहे असा आरोप सुरुवातीपासून होत होता. गडकरींनी खुलासा करून देखील हा आरोप होण्याचे थांबले नव्हते. कारण असा हस्तक्षेप असल्याचे वेळोवेळी संकेत मिळत होतेच. या निवडणुकीत पोस्टाने मतदारांकडे मतपत्रिका पाठवायच्या आणि मतदारांनी त्या मतपत्रिका भरून साहित्य संघाकडे परत पाठवायच्या अशी पद्धत आहे. इथे सर्वच पॅनलच्या उमेदवारांनी गावोगावी फिरून मतदारांकडून कोऱ्या मतपत्रिका गोळा केल्या आणि स्वतःच टिकमार्क करून मतपेटीत टाकल्या असा आरोप होत आहे. त्यातही अनेक मतपत्रिका या पोस्टातून परस्पर पळवल्या गेल्या. त्या मतदारांपर्यंत पोहोचल्याच नाहीत, तर आधीच कोणीतरी पळवून त्यावर टिक करून दुसऱ्याच व्यक्तीने मतपेटीत टाकल्या, असे प्रकारही उघडकीस आले आहेत. या सर्व कामात भाजपने स्वतःची आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संघटना यंत्रणा मोठ्या प्रमाणात वापरली. तसेच आर्थिक गैरव्यवहार देखील केले असा आरोप वारंवार केला जात आहे. मतदार यादीदेखील सदोष असल्याचे आढळून आले. अनेक मृत व्यक्तींची नावे अजूनही कायम आहेत, तर अनेक उमेदवारांचे आणि मतदारांचे वीस वर्षांपूर्वीचे जुने पत्ते तसेच आहेत. त्यात सुधारणा करण्याचे कष्ठी साहित्य संघाच्या कार्यालयाने घेतलेले नाही. त्याचाच फायदा घेऊन या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे बोलले जात आहे. रविवारी निकाल लागल्यानंतर नियमानुसार आठवड्याभरात लवादासमोर दाद मागावी लागते आणि तरीही समाधान झाले नाही, तर न्यायालयात दाद मागता येते. इथे बहुतेक सर्व पराभूत उमेदवार न्यायालयात जाणारच हे चित्र स्पष्ट दिसते आहे.

गिरीश गांधी साहित्य संघाचे अध्यक्ष झाले तरी त्यांच्यासमोर आव्हाने बरीच राहणार आहेत. ज्या ठिकाणी साहित्य संघाचे जुने कार्यालय होते तिथे व्यावसायिक संकुल झाले आहे. त्या ठिकाणी नव्याने सांस्कृतिक संकुल उभे राहावे आणि १९९५ पूर्वी त्या परिसरात जे सांस्कृतिक वातावरण होते ते पुन्हा निर्माण व्हावे अशी अपेक्षा गिरीश गांधींचे चालू राजकीय गॉडफादर नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. ती पूर्ण करण्याचे खरे आव्हान गांधींसमोर आहे. त्याशिवाय पंधरा वर्षांत साहित्य संघातील थांबलेल्या सांस्कृतिक गतीविधी पुन्हा सुरू करण्याचे काम त्यांना करावे लागणार आहे. दुसरे म्हणजे तिथला प्रशासनिक गलथानपणा संपवून यापुढे लोकशाही पद्धतीने पारदर्शी निवडणुका कशा होतील ही व्यवस्था करण्याचे खरे आव्हान त्यांना पेलायचे आहे. म्हणजेच आज जसा गिरीश गांधींवर भाजपची आणि संघाची यंत्रणा वापरून आणि गैरप्रकार करून विजयी झाल्याचा आरोप मोठ्या आवाजात केला जात आहे तसा आरोप भविष्यात कोणीही करू शकणार नाही ही काळजी त्यांना घ्यायची आहे. विदर्भ साहित्य संघ ही मराठी भाषिकांची साहित्यिक संस्था म्हणून ओळखली जाते. त्यामुळे गिरीश गांधी सर्वांना प्रेमाने जवळ करून काम पुढे नेतात यावर त्यांचे यशापयश अवलंबून राहणार आहे.

# महाज्योतीच्या प्रकल्प व्यवस्थापकाला बडतर्फ करा



**गोंदिया:–** महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) येथील कौशल्य विकास विभागातील कथित गैरव्यवहार प्रकरणात प्रकल्प व्यवस्थापक कुणाल सिरसाठे यांना तत्काळ बडतर्फ करून तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांच्या भूमिकेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी सकल ओबीसी महामोर्चाने केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री, मुख्य सचिव तसेच संबंधित

विभागांकडे निवेदन देण्यात आले आहे. महामोर्चाच्या निवेदनानुसार, सिरसाठे यांनी शासकीय सेवेत असताना स्वतःच्या खाजगी कंपन्या स्थापन करून पदाचा गैरवापर केला. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि जीएसटी नोंदींनुसार, २४ ऑगस्ट २०२३ रोजी ममहास्किल टेक इनोव्हेटिव्ह फाऊंडेशनफ ही कंपनी स्थापन करण्यात आली. या कंपनीत ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत संचालक होते. त्यानंतर त्यांच्या पत्नी तेजल कांबळे यांची संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.


तसेच, ५ मे २०२५ रोजी मइझी रूट एक्सिमफ ना–वाची आणखी एक कंपनी स्थापन करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. पत्रकार परिषदेनंतर उघडकीस येण्याच्या भीतीने या कंपनीची जीएसटी नोंदणी रद्द करण्यात आली आणि संकेतस्थळही बंद करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. सिरसाठे यांनी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांच्या संगनमताने स्वतःच्या ममहास्किलफ कंपनीमार्फत आणि इतर संस्थांच्या माध्यमातून कौशल्य विकास विभागातील कोट्यवधी रुपयांची कामे मिळवली.

कुणाल शिरसाठे २४ ऑगस्ट २०२३ पासून २४ फेब्रुवारी २०२५ पर्यंत महास्किल चे संचालक म्हणून कार्यरत होते. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन तेजल कांबळे यांना संचालक केले. तेजल कांबळे ह्या कुणाल शिरसाठे यांच्या पत्नी आहेत.

२४ऑगस्ट २०२३ ते आजपर्यंतच्या काळात कुणाल शिरसाठे यांनी आपल्या पद–ाचा प्रभाव वापरून तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांच्या आशीर्वादाने आणि संगनमताने ग्रेस एड्युनेटफ आणि इतरही संस्थांच्या सोबत स्वतःच्या ममहास्किलफकंपनीच्या माध्यमातून कौशल्य विकास विभागाची महत्त्वाची कोटींची कामे लाटली असे निदर्शनात येत आहे. स्वतः शासकीय कंपनीत कर्मचारी असतांना स्वतःच्या खाजगी कंपन्यांना काम देणे हे सेवाशर्तींचे आणि नैतिकतेचे पूर्णपणे उल्लंघन आहे.

## महसूल अधिकारी गायत्री बोरकर एसीबीच्या जाळ्यात

**गोंदिया:–** जिल्ह्यातील अर्जुनी–मोरगाव तालुक्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (अउइ) यशस्वी सापळा रचत ग्राम महसूल अधिकारी महिलेला १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईमुळे महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.



प्राप्त माहितीनुसार, ४२ वर्षीय तक्रारदार यांचा विटभट्टीचा व्यवसाय असून त्यासाठी लागणारी माती विविध शेतकऱ्यांकडून आणली जाते. यापूर्वी मार्च २०२५ मध्ये संबंधित तलाठ्याने अवैध माती उत्खननाच्या नावाखाली तक्रारदाराकडून ३३ हजार रुपये घेतल्याचा आरोप आहे. त्यानंतर पुन्हा १२ मार्च २०२६ रोजी ग्राम महसूल अधिकारी श्रीमती गायत्री बोरकर (वय ४१) यांनी तक्रारदाराशी संपर्क साधून अवैध उत्खननावर कारवाई न करण्यासाठी ३७ हजार रुपयांची मागणी केली. यापैकी १० हजार रुपये १२ मार्च रोजी स्वीकारल्यानंतर उर्वरित रक्कम मागितली जात होती. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने २३ मार्च २०२६ रोजी गोंदिया येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली.त्यानुसार अउइ पथकाने पंचांसह पडताळणी केली असता आरोपीने एकूण ३५ हजार रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर २३ मार्च रोजी सापळा रचण्यात आला. या कारवाईदरम्यान आरोपीने १० हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने तिला रंगेहाथ पकडले.आरोपीच्या अंगझडतीत १० हजार रुपयांची लाच रक्कम जप्त करण्यात आली असून तिच्याकडून रिअलमी कंपनीचा मोबाईल फोनही ताब्यात घेण्यात आला आहे. तसेच घरझडतीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.या प्रकरणी अर्जुनी–मोरगाव पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# सालेकसा येथे कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करा

### राष्ट्रवादी पक्षाची मागणी :प्रफुल्ल पटेल यांना दिले निवेदन



**सालेकसा :–** राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा गोंदिया जिल्ह्याचे विकास पुरुष खा. प्रफुल पटेल यांना तालुक्यातील सर्व शेतकरी, नागरिकांच्या वतीने सालेकसा तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्यात यावी, या मागणीचे निवेदन शुक्रवारी (दि. २०) देण्यात आले.

अनेक वर्षापासून रखडलेली कृषी उत्पन्न बाजार समिती आपल्या पुढाकाराने लवकरात लवकर सालेकसा तालुक्यात स्थापन करण्यात यावी. याचा थेट लाभ सर्व शेतकरी, मजूर, व्यापारी, सुशिक्षित बेरोजगार यांना होणार. शेतकऱ्यांना आपल्या पिकाचे योग्य दर मिळणार. तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापना केल्याने तालुक्यातील इतर ठिकाणी जाणारे मजुरांचे स्थलांतर होणार नाही आणि त्यांना याच तालुक्यात रोजगाराची संधी उप–लब्ध होणार. शिष्टमंडळात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे, शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, किसान आघाडीचे किसन रहांगडाले उपस्थित होते. खा. प्रफुल्ल पटेल यांनी आपण या विषयावर राज्य शासनाचे संबंधित विभागाला योग्य व ठोस पाठपुरावा करणार, अशी ग्वाही दिली.

# जिल्ह्यातील जंगलांना 'फायर' चे टेंशन !



**गोंदिया:–**जिल्ह्यातील जंगलांना मार्च महिन्याच्या प्रारंभापासूनच मोठ्या प्रमाणात वणवे लागण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे मौल्यवान वनसंपत्ती मभस्मसात होत असल्याचा प्रकार विविध वनविभागात दिसतो. असे असले तरी वन विभागाकडून केवळ मफायर लाईनफ करून जनजागृतीचे काम केले जाते. त्यातच रविवारी दुप–ारी सडक अर्जुनी वनपरिक्षेत्रातील प्रादेशिक जंगलात वणवा लागली. सायंकाळपर्यंत वन विभागाकडून कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील जंगलांना फायरचे टेंशन वाढत असल्याचे चित्र पुढे येत आहे.

दरवर्षी मार्च ते एप्रिल महिन्यापासून मोहफूल संकलन हंगामाला सुरुवात होते. या हंगामात अनेक नागरिक मोहफुले संकलनासाठी जंगल, शेतशिवारात आग लावतात. विशेषतः तेंदुपत्ता हंगामाच्या एका महिन्यापूर्वी कंत्राटदारांमार्फत जंगल जाळले जाते.

विशेष म्हणजे, मागील काही वर्षांचा अनुभव पाहता २०२१ या वर्षी वन्यजीव विभागाच्या अखत्यारीत येत असलेल्या नागझिरा अभयारण्यातील जंगल परिसरात आग लागून कर्तव्यावर असलेल्या तीन वनमजूरांचा होरपळून मृत्यू झाला होता. त्यात गेल्या वर्षीही वणव्यात होरपळून एक वनमजुराचा मृत्यू झाल्याची घटना गोठणगाव वनपरिक्षेत्रात घडली होती.

यंदा उन्हाळ्याच्या सुरुव–ातीला देवरी वनपरिक्षत्र अंतर्गत जंगल परिसरात वणव्याची घटना पुढे आली असताना रविवारी दुपारी पुन्हा सडक अर्जुनी वनपरिक्षेत्र अंतर्गत येत असलेल्या गराडा, बकीटोला, गोंगले, डुंडा परिसरातील नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखिव प्रकल्पाच्या बफर झोन व प्रादेशिक जंगलात आग लागली. या वणव्यामुळे अनेक सरपटणारे जीव–जंतू स्वाहा झाल्याचे वास्तव आहे.

# वैनगंगा कृषीधारा महोत्सवात तब्बल २२ लाखांची उलाढाल

**भंडारा:**रेल्वे ग्राउंड, खात रोड,भंडारा येथे दिनांक २० ते २४ मार्च २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ङ्गवैनगंगा कृषीधारा महोत्सव २०२६फ व ङ्गनव तेजस्विनी जिल्हास्तरीय प्रदर्शनीफ ला नागरिक, शेतकरी व महिला बचत गटांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पाच दिवस चाललेल्या या महोत्सवात विविध स्टॉल्समधून मिळून सुमारे २२ लाख रुपयांची विक्री झाली असून स्थानिक उत्पादकांना मोठा आर्थिक फायदा झाला आहे.कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) भंडारा आणि महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात शेती आणि ग्रामीण उद्योजकतेचा संगम पाहायला मिळाला.महोत्सवात उभारण्यात आलेल्या स्टॉल्समध्ये खते, नैसर्गिक उत्पादने, दर्जेदार तांदूळ, सेंद्रिय शेती साहित्य, तसेच माविमच्या बचत गटांनी तयार केलेल्या घरगुती वस्तू, हस्तकला उत्पादने आणि खाद्यपदार्थांची मोठ्या प्रमाणावर विक्री झाली. विशेषतः महिला बचत गटांच्या स्टॉल्सना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

# जागतिक चिमणी दिनानिमित्त "लॉयड्स'चा जनजागृती कार्यक्रम



**गडचिरोली :–** लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड यांनी जागतिक चिमणी दिन २०२६ निमित्त हेडरी येथील लॉयड्स राज विद्यानिकेतन शाळेत जनजागृती कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना चिमण्यांचे पर्यावरणीय महत्त्व आणि त्यांच्या संवर्धनाची गरज याबाबत जागरूक करणे हा होता.हा कार्यक्रम सुरजागड आयर्न ओर खाण प्रकल्पाच्या पर्यावरण विभागामार्फत आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात संवादात्मक सत्र घेण्यात आले, ज्यामध्ये चिमण्यांची भूमिका, कीटक नियंत्रण, बियांचे प्रसारण आणि पर्यावरणाच्या आरोग्याचे विशद करण्यात आले.

विद्यार्थ्यांना चिमण्यांची घटती संख्या ही शहरीकरण, अधिवास नष्ट होणे, कीटकनाशकांचा वापर आणि प्रदूषण यांसारख्या कारणांमुळे होत असल्याची माहिती देण्यात आली. तसेच या समस्यांचा गडचिरोली जिल्ह्याच्या स्थानिक संदर्भातही आढावा घेण्यात आला.

या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना सोपे संवर्धन उपाय अवलंबण्याचे आवाहन करण्यात आले. त्यात पक्ष्यांसाठी पाणी व अन्न उपलब्ध करून देणे, घरटी बसविण्यासाठी बॉक्स तयार करणे आणि नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करणे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजवून जैवविविधता संवर्धनासाठी योगदान देण्याची प्रेरणा मिळाली.

### कोणालाही सोडणार नाही; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई:–अशोक खरात प्रकरणावरून विरोधकांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. या घटनेत गुंतलेल्या सर्वांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी विरोधी पक्षातील अनेक नेत्यांनी केली. याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस याप्रकरणी गंभीरपणे कारवाई करीत असल्याचे सांगितले.

# अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील आरोग्य यंत्रणेचा कायापालट होणार

**अर्जुनी–मोरगाव: –**अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील आर–ोग्य सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि ग्रामीण भागातील रुग्णांना दर्जेदार अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे व उपकेंद्रांचे श्रेणीवर्धन करून तेथे अद्ययावत सुविधा पुरवल्या जातील.अनेक ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे आरोग्य सेवा विस्कळीत होत आहे. ही रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने तात्काळ भरून आरोग्य सेवा पूर्ववत करण्याचे निर्देश शनिवारी पार पडलेल्या राज्यस्तरीय आरोग्य विषयक समितीकडून नवेगावबांध येथे बैठकीत देण्यात आले.



या बैठकीला अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार राजकुमार बडोले.आरोग्य सेवा रुग्णालय मुंबईच्या सहसंचालक डॉ.सुनीता गोल्हाईत,आरोग्य सेवा प्राथमिक मुंबई सहसंचालक डॉ.सरिता हजारे, नागपूर विभाग आरोग्य उपसंचालक डॉ.शशिकांत शंभरकर, गोंदिया जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हर व आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळीअधिकाऱ्यांनी,लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आणि सर्व प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीला पंचायत समिती अर्जुनी मोरगावच्या सभापती आम्रपाली डोंगरवार, सडक अर्जुनीचे सभापती चेतन वडगाये,जि.प.सदस्य सुधाताई रहागंडाले,माजी जि.प.सदस्य किशोर तरोणे,प्रकाश गहाणे, कृ.उ.बा.स. सडकअर्जुनी सभापती डॉ.अविनाश काशीवार, पंचायत समिती सदस्य होमराज पुस्तोडे, योगेश नाकाडे, माजी सरपंच डी.यु. रहांगडाले, विलास बागडकर, रामदास बोरकर यांच्यासह आरोग्य विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या मुंबई येथील अधिवेशनात आमदार राजकुमार बडोले यांनी अर्जुनी मोरगाव आणि सडक अर्जुनी क्षेत्रातील आरोग्य विभागाच्या दुरवस्थेचा मुद्दा लावून धरला होता. यावर सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार, राज्याच्या आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या दुर्गम भागाचा दौरा केला.महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

### क्षयरुग्ण शोध मोहीमेचे जिल्हास्तरीय उद्घाटन

भंडारा: सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत जिल्हा क्षयरोग केंद्र भंडारा येथे २४ मार्च जागतिक क्षयरोग दिन साजरा करण्यात आला. यावेळी क्षयरुग्णांना पोषक आहार कीटचे वाटप करण्यात आले. सर्व क्षयरुग्णांनी नियमित औषधोपचार घेऊन क्षयरोगापासुन पुर्णपणे बरे व्हावे असे आवाहन यांनी केले.

# गोंदियात 'घर घर संविधान मेळावा' उत्साहात




**गोंदिया :–** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने तसेच स्थानिक आवाज इंडिया टीव्ही, मैत्री मल्टीपर्पज सोशल वेल्फेअर सोसायटी व विविध सामाजिक संघटनांच्या सहकार्याने भारतीय संविधानाच्या ७५ व्या वर्षपूर्तीनिमित्त आणि महाड सत्याग्रह क्रांती दिनाच्या १०० व्या वर्षात पदार्पणानिमित्त मघर घर संविधान मेळावाफ हा समतेचा वैचारिक व सांस्कृतिक महोत्सव २१ मार्च रोजी भीमनगर ग्राउंड, गोंदिया येथे उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर महाराष्ट्र गीतवभारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करण्यात आले. मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, खापर्डे कॉलोनी येथील विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. त्यानंतर विविध वसतिगृहांतील विद्यार्थिनींनी देशभक्तीपर नृत्य, संविधान जागृती पथनाट्य व वक्तृत्वाद्वारे प्रभावी सांस्कृतिक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात विविध सामाजिक संघटनांचे मान्यवर प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये ओबीसी अधिकार मंचचे संयोजक खेमेंद्र कटरे, अतुल सतदेवे, प्रा. डॉ. दिशा गेडाम, सी. पी. बिसेन, वसंत गवळी, भोजराज ठाकरे, प्रा. मनोज मेश्राम, दीपा काशीवार, तिलक दीप, कैलाश भेलावे, आदेश गण–वीर, पौर्णिमा नागदेवे, रश्मी येस–नसुरे, प्रियांका, मनोहर भावे, एड. सचिन राहुलकर, कैलाश डोंगरे, कमल बोंबार्डे आदींचा समावेशहोता. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यामध्ये लक्ष्मण खेडकर, गृहपाल उज्वला रामटेके, आशा मेश्राम, अश्विनी दिघोरे, खराबे , गिरी आदी उपस्थित होते.

या महोत्सवात संविधान जलसा शिवराय ते भिमरायफ या संकल्पनेवर आधारित जाधव सिस्टर्स यांचा प्रेरणादायी संगीतमय कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला. सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत करणाऱ्यांना संविधान प्रास्ताविका भेट करण्यात आले.

समाजात समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचा प्रसार व्ह–ावा तसेच महामानवांच्या विचारांचा व्यापक प्रचार व्हावा, या उद्दे–शाने आयोजित या कार्यक्रमाला नागरिकांनी आपल्या कुटुंबियांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाला प्रा. डॉ. दिशा गेडाम यांनी मार्गदर्शक म्हणून संबोधित केले, संचालन गृहपाल उज्वला रामटेके, उपस्थितांचे आभार अतुल सतदेवे यांनी मानले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)

# गोंदियात डॉ. आंबेडकर जयंतीची जय्यत तयारी;ॲड. सत्यप्रकाश, महेंद्रसिंग लोधी आणि राजकुमार भाटी येणार



**गोंदिया :–** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीसाठी गोंदियात जय्यत तय्यारी सुरु झाली आहे. पुढील महिन्यात हा कार्यक्रम ११ एप्रिल पासून सुरु होणार असून १५ एप्रिल रोजी समारोप होणार आहे. या पाच दिवशीय कार्यक्रमादरम्यान विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. दरम्यान १४ एप्रिल रोजी आयोजित मुख्य कार्यक्रमात दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयाचे ॲड सत्यप्रकाश गौतम आणि मध्यप्रदेशचे महेंद्रसिंग लोधी मुख्यवक्ता म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. तर १५ एप्रिल रोजी आयोजित कॅडर कॅम्प मध्ये उत्तरप्रदेशचे फुले, शाहू, आंबेडकरी ज्येष्ठ विचारवंत राजकुमार भाटी मार्गदर्शन करणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्व. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अरविंद भावे यांनी दिलेल्या माहिती नुसार जयंतीच्या कार्यक्रमासाठी कार्यकर्ते कामाला लागले असून हा कार्यक्रम नगरपरिषद सुभाष शाळेच्या पटांगनावर होणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त ११ एप्रिल रोजी सकाळी भीमनगर येथून रॅली काढण्यात येणार असून समारोप मरारटोली येथे होणार आहे. १२ एप्रिल रोजी जिल्ह्या–तील विविध शाळेतून विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा घेण्यात येणार असून वरिष्ठ अधिकारी हे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा बद्दल मार्गदर्शन करणार आहेत. १३ एप्रिलच्या मध्यरात्री फटाक्याच्या लड्या फोडून अतिशबाजी करण्यात येईल. त्यांनतर १४ एप्रिल रोजी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करून जयंतीच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात होईल. शहरातील प्रत्येक भागातून रॅली काढण्यात येणार असून फुले शाहू आंबेडकरी विचारधारेवर देखाव्यांचे प्रदर्शन घडविण्यात येणार आहे. याप्रसंगी विविध समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांचा स्मृती चिन्ह देऊन सत्कार करण्यात येईल.

सत्यप्रकाश आणि इंजि. महेंद्रसिंग लोधी मार्गदर्शन करणार आहेत. १५ एप्रिल रोजी उत्तर प्रदेशचे फुले शाहू आंबेडकरी विचारवंत राजकुमार भाटी प्रबोधन करणार आहेत. मुंबईचा जय ऑर्केस्ट्रा यांची मनोरंजन पर संगित मैफल, भीम बुद्ध गीतांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. दरम्यान या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आ–वाहन जयंती समितीचे अध्यक्ष अरविंद भावे, उपाध्यक्ष दिनेश उके, ॲड.कार्याध्यक्ष प्रा. रितेश चौरावार, प्रा. डॉ. अश्विन खांडेकर, संयोजक राजश्री पुंजेकर, कोषाध्यक्ष किशोर रामटेके, सचिव अंकुर गजभिये, विलास वासनिक, पंकज वासनिक, इंजिनिअर छोटू बोरकर, संजय वाहने, मच्छिंद्र भेलावे, मनीषा गजभिये, कोकिळा राहुलकर, वंदना श्यामकुवर, समता गणवीर, सविता उके, डॉ. राजेश उके, सुनील पाटील, नूरलाल ऊके, सुशील गणवीर, संतोष शामकुमार, सुनील डोंगरे, अनंत टेंभुरकर, अशोक कांबळे, एन. एल. मेश्राम, नरेंद्र मेश्राम स्टडी पॉईंट, एड. एकता गण–वीर, सुनील मेश्राम, ॲड. अंजली (चव्हाण), धनंजय मेश्राम, नरेश उके, प्रा. सुरेश नंदेश्वर, सुनील मेश्राम, पृथ्वीराज कोल्हटकर यांनी केले आहे.

# वनविभागासाठी भविष्यातील योजना तयार असाव्यात : पियुषा जगताप

**साकोली:–** नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील कर्मचारी आणि अधिकारी यांची जबाबदारी फार मोठी आहे. आपल्या विभागाकडून नागरिकांच्या फार मोठ्या अपेक्षा असतात. याकरिता अधिकारी आणि कर्मचारी यांनी नेहमी सतर्क असावे. निसर्गाविषयी महत्व सांगण्यासाठी गावकरी आणि विद्यार्थी यांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यांच्या सहकार्यातूनच आपले अनेक उपक्रम राबविण्यात येतात. कर्मचारी आणि अधिकारी म्हटले की स्थानांतर आलेच. एक जाईल दुसरा येईल. परंतु आपण केलेले प्लॅनिंग पुढच्या काळात येणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सोपे जाईल.त्यामुळे भविष्यातील योजना तयार असाव्यात असे प्रतिपादन नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प गोंदिया तथा क्षेत्र संचालक पियुषा जगताप यांनी साकोली येथे केले.




त्या वैनगंगा बहुउद्देशीय विकास संस्था द्वारा संचालित, बाजीरावजी करंजेकर कॉलेज ऑफ फार्मसी येथील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या मारुती चितमपल्ली निसर्ग कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाद्वारे विद्यार्थ्यांना निसर्गाशी प्रत्यक्ष जोडणे, जैवविविधतेचे महत्त्व पटवून देणे, पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाबद्दल मूलभूत माहीती देणे याउद्देशाने ऑक्टोबर २०२५ ङ्गचितमपल्लींची निसर्ग शाळाङ्ग निसर्ग शिक्षण उपक्रम व्याघ्घ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील १६ जिल्हा परिषद शाळेतील ४८१ विद्यार्थ्यांकरीता सुरु करण्यात आला होता.

या कार्यक्रमामध्ये महिन्यातुन एक दिवस विद्यार्थ्यांना क्षेत्रीय भेटी, जंगल सफारी, निसर्ग फेरी, वन्यजीव निरीक्षण, तसेच विविध विषयांवर मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली. या करीता निसर्ग मंडळ गोंदिया, हिरवळ बहुउद्देशिय संस्था गोंदिया आणि डएअढ भंडारा या छत्रृज सह त्यांचे प्रतिनीधी यांचे सहकार्य लाभले आले.

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प गोंदिया, भंडारा वतीने आयोजित या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचे उपसंचालक प्रीतमसिंग कोडापे, पियुष शेखसेरिया हे होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शाहिद खान, मुकुंद धुर्वे, रुपेश निंबार्ते, वनरक्षक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर यात वनअध्यापन या उपक्रमात उत्कृष्ट कार्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या वतीने यथोचित प्रशस्त पत्र देऊन गौरव करण्यात आला.


याप्रसंगी निसर्गप्रेमी शिक्षक विनोद भोवते यांच्या मनवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प: पाणी जीवनफयांच्या पुस्तकाचे विमोचन विभागाच्या वतीने करण्यात आले. पियुष सेकसेरिया यांनी वनअध्यापकांना वन्यजीवांची माहीती असलेले विविध प्रकारचे भित्तीपत्रक, कार्डस, , नकाशे सापमामाचा वाडा वापर करुन विद्यार्थ्यांशी सुसंवाद कसा साधता येईल याबाबत मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक सहा. वन संरक्षक मनिषा चव्हाण, संचालन वनपाल अरविंद बडगे तर आभार वनपाल प्रेमदास भाकरे यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी विद्यार्थिनी, समस्त सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल वनरक्षक वन–अध्यापक उपस्थित होते.

# बाह्मणी ग्रामपंचायतमध्ये ११.३७ लाखांचा घोटाळा उघड

## दोन महिन्यांपासून चौकशी होती थंडबस्त्यात : छगनलाल भेदे यांच्या प्रयत्नांना यश

**गोंदिया :–** आमगाव तालुक्यातील ग्राम बाह्मणी येथील ग्रामपंचायतमध्ये सन २०२१–२२ ते २०२४–२५ या वर्षात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, १५ वा वित्त आयोग, स्वच्छ भारत मिशन, ईतर योजना अंतर्गत रस्ता खडीकरण, सिमेंट रस्ता, पेवर ब्लॉक, सिमेंट नाली व ईतर बांधकाम करण्यात आले. मूल्याकंनानुसार बांधकामावर झालेला खर्च व प्रत्यक्षात झालेले कामामध्ये तफावत आहे. या बांधकामात ११ लाख ३७ हजार ८१५ रुपयांची अफरातफर झाल्याचे खंडविकास अधिकारी यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना मंगळवारी (दि.१७) सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे.




आमगाव तालुक्यातील ग्राम बाम्हणी येथे विविध विकास कामांमधील भ्रष्टाचार व आर्थिक अनियमिततेबाबत पीजी पोर्टलवर गावकरी छगनलाल भेदे यांनी तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीची दखल दोन महिन्यांपासून घेण्यात आली नाही. परंतु जिकडे–तिकडे झालेल्या आरडा–ओरडमुळे नंतर चौकशी करण्यात आली. आमगाव येथील गट विकास अधिकाऱ्यांनी १४ जानेवारी २०२६ रोजी संबंधित विभागांना स्पष्ट आदेश देत अवघ्या सात दिवसांच्या आत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. तक्रारदार भेदे यांनी सन २०२० ते २०२५ या कालावधीत ग्रामपंचायत क्षेत्रात करण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करत पीजी पोर्टलवर तक्रार दाखल केली होती. त्यानुसार हा घोटाळा उघडकीस आपण्यात आला.

**चौकशी समितीने असे काढले निष्कर्ष**

ग्रामपंचायत बाम्हणी मधील सन २०२१–२२ ते २०२५–२६ या वर्षातील ग्रामनिधी, १५ वा वित्त आयोग, स्वच्छ भारत मिशन, ग्राम पाणी पुरवठा निधी, अनु. जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व इतर योजना अंतर्गत केलेल्या बांधकामाचे दस्ताऐवज व मौका तपासणी करण्यात आली.

ग्रामपंचायत बाह्मणीमध्ये रस्ता खडीकरण, सिमेंट रस्ता, पेपर ब्लॉक लावणे, सिमेंट नाली व ईतर बांधकाम करण्यात आले मात्र मूल्याकंनानुसार बांधकामावर झालेले खर्च व प्रत्यक्षात झालेले बांधकाम यामध्ये तफावत आहे. या बांधकामाचे तफावतीत ११ लाख ३७ हजार ८१५ रुपयांची अफरातफर झाल्याचे दिसून येते.

ग्रामपंचायत बाम्हणी मधील सन १ २०२१–२२ ते २०२५–२६ या वर्षातील बांधकामातील तफावत मधील ११ लाख ३७ हजार ८१५ रूपयांची अफरातफर करण्यात आली त्या कालावधीतील संबंधीत अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी हे दोषी असल्याचे दिसून येते.

# भंडाऱ्यात बोगस दिव्यांग प्रमाणपत्र; ७ अधिकारी बडतर्फ व निलंबित




**भंडारा :–** बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासकीय सेवेत शिरकाव करणाऱ्या भंडारा महसूलप्रशासनातील ७बड्या अधिकाऱ्यांवर जिल्हा प्रशासनाने कठोर कारवाई केली आहे. यामुळे संपूर्ण जिल्ह्यात आणि प्रशासकीय वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली आहे. नागपूर वैद्यकीय मंडळाने केलेल्या फेरतपासणीत या अधिकायांचे बिंग फुटले असून, यात तीन अधिकाऱ्यांना बडतर्फ, तर तिघांना निलंबित करण्यात आले आहे. एका नायब तहसीलदारात्त्या बडतर्फीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी लाटण्याचे प्रकार सुरू असल्याची ओरड होत होती. सामाजिक कार्यकर्ते विजय क्षीरसागर यांनी याविरोधात गेल्या तीन वर्षांपासून सातत्यपूर्ण लढा दिला होता.

त्यांच्या तक्रारीनंतर जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील ३२२ दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची पडताऋणी सुरू केली. पहिल्या टप्प्यात महसूल विभागातील २२ कर्मचाऱ्यांची नागपूर मेडिकल बोर्डामार्फत पुनर्तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये ७जणांची प्रमाणपत्रे बनावट असल्याचे सिद्ध झाले.

सेवेतून बडतर्फ वसुंधरा वासनिक / इंगळे मंडळ अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (पुनर्वसन शाखा), शारदा सूर्यभान झंझाडः तलाठी, मोहाडी. विनोद भातेः तलाठी, मोहाडी. निलंबित शिवशंकर साखरवाडे, सहाय्यक महसूल अधिकारी, योगराज बाबुराव हांगरे, तलाठी, लाखनी, दिलीप सिग भरतसिंगठाकूर, सहाय्यक महसूल अधिकारी, पवनी, बडतफींचा प्रस्ताव प्रलंबित आनंद हड्डेवार, नायब तहसीलदार, भंडार यांच्या बडतर्फीचा प्रस्ताव जिल्हा निव्ड सनितीने शासनाकडे पाठविला आहे.

या प्रकरणात २५ संशयित अधिकारी आढळले होते. त्यापैकी २२ जणांची तपासणी झाली, मात्र, उर्वरित ३ अधिकाऱ्यांनी अद्यापही वैद्यकीय तपासणी करून घेण्यास टाळाटाळ केली आहे. प्रशासनाने या तिघांनाही कारणे दाखवा नोटीस बजावली असून, त्यांच्यावरही कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.

प्रशासनाने निलंबन बडतफींची कारवाई केली असली, तरी या दोषींकडून आतापर्यंत लाटलेला दिव्यांग भत्ता, अतिरिक्त सवलती आणि पदोन्नतीचे लाभ यांची आर्थिक वसुली अद्याप झालेली नाही. तसेच, मदिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६फ नुसार यांच्यावर अद्याप फौजदारी गुन्हे दाखल न झाल्याने सामाजिक वतुर्ळातून मागणी जोर धरत आहे.

# जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न २ लाख ५ हजार, दररोज हातात येतात अवघे ५६२ रुपये

**गोंदिया :–** राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार जिल्ह्याच्या अर्थचक्रात यंदा वाढ झाली आहे. दरडोई उत्पन्नाच्या पातळीवर वाढीचा वेग थोडा वाढल्याचे चित्र पुढे आले आहे. चालू किंमतींनुसार दरडोई सांकेतिक निव्वळ जिल्हा उत्पन्न २ लाख ५ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहेः मात्र महागाईचा विचार करता प्रत्यक्ष क्रयशक्तीतील वाढ फारशी वाढ झाली नाही.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आर्थिक पाहणी अहवालात गेल्या चार वर्षांच्या दरडोई उत्पन्नाची जिल्हानिहाय आकडेवारी समोर आली आहे. त्यात गोंदिया जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न २ लाख ५ हजार २२७ इतके दर्शविण्यात आले असून, ते गतवर्षीच्या तुलनेत १३ हजार ९९९ रुपयांनी वाढले आहे. देशभरातील त्या–त्या राज्य सरकारच्यावतीने जिल्ह्यांतील उद्योग, व्यापार, सेवा, उत्पादन, मनुष्यबळ, लोकसंख्या आदी बाबींचा अभ्यास करून जिल्ह्याचे उत्पन्न व त्या आधारे दरडोई उत्पन्न काढले जाते. जिल्ह्यातील प्रत्येक व्यक्तीची वार्षिक कमाई म्हणजे त्या जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न होय. हे उत्पन्न त्या जिल्ह्यातील नागरिकांचे राहणीमान, जीवनशैली, आर्थिक प्रगती आदी बाबींचे निदर्शक असते.

**४ वर्षांत ६६ हजार ४६३ रुपयांची वाढ !**

२०२१–२२ मध्ये जिल्ह्याचे दरडोई




सांकेतिक निव्वळ उत्पन्न १,३८,७६४ इतके होते. २०२४–२५ मध्ये ते २ लाख ५ हजार इतके झाले असून गेल्या चार वर्षांत निव्वळ उत्पन्नात ६६४६३ इतकी वाढ झाल्याचे दिसत आहे.

**उत्पन्नवाढ/कमी वाढीची काय कारणे ?**

ढोबळ मानाने कृषी उत्पादनातील चांगली कामगिरी, सेवा क्षेत्रातील वाढ, शासनाच्या पायाभूत सुविधांवरील खर्च आणि शासकीय योजनांचा सकारात्मक परिणाम यामुळे यंदा जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न वाढल्याचे मानले जात आहे.

**गतवर्षीपेक्षा फक्त ५० रुपयेच वाढले, जगावे कसे?**

गतवर्षी जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न ५१२ रुपये इतके निघाले होते. २०२४–२५ च्या अहवालानुसार त्यात ५० रुपये इतकीच वाढ झाली असून जगायचे कसे, असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. महागाई प्रचंड वाढत असताना त्या तुलनेत मात्र उत्पन्न कमी आहे.

**जिल्ह्यात वार्षिक उलाढाल ३३,५७९ कोटी रुपये !**

चालू किंमतीनुसार सांकेतिक स्थूल जिल्हा उत्पन्न ३३,५७९ कोटी रुपये इतके दर्शविण्यात आले असून तीच जिल्ह्याची वार्षिक उलाढाल होय.

**१४ लाख ६४ हजार, लोकसंख्या, रोजची कमाई ५६२ रुपये**

जिल्ह्याची एकूण लोकसंख्या सध्या १४ लाखांवर ६४ हजारावर पोहोचली आहे. नागरिकांची रोजची कमाई मात्र ५६२ रुपये इतकीच निघत असून याबाबत सर्वच स्तरांतून चिंता व्यक्त होत आहे.

## आदिवासी उमेदवारांसाठी स्पर्धा परीक्षा माहिती व मार्गदर्शनाचे प्रशिक्षण

**गोंदिया :–** आदिवासी उमेदवारांसाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, माहिती व मार्गदर्शन केंद्र, देवरी कार्यालयाचे स्पर्धा परीक्षा माहिती व मार्गदर्शनाचे वर्ष २०२६–२७ चे पहिले सत्र दि.१ एप्रिल ते १५ जुलै २०२६ या कालावधीसाठी घेण्यात येणार आहे. यासाठी आदिवासी जमातीमधील (अनुसूचित जमाती प्रवर्ग) उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला व जातीचे प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रतीसह अर्ज कार्यालयास सादर करावा. योजनेचे स्वरुप व उमेदवारांच्या पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

प्रशिक्षणार्थ्यांची शैक्षणिक व इतर पात्रता : या प्रशिक्षणासाठी उमेदवार हा किमान इयत्ता १० वी पास असावा. उच्च शैक्षणिक पात्रताधारक व टंकलेखक/संगणक/लघुलेखक परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. उमेदवार आदिवासी जमाती (अनुसूचित जमाती) प्रवर्गातील असावा. यासाठी स्त्री व पुरुष दोन्ही पात्र आहेत. उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे. उमेदवार गोंदिया आणि भंडारा या दोन जिल्ह्यापैकी कोणत्याही एका जिल्ह्याचा रहिवासी असावा. उमेदवाराने सदर प्रशिक्षणाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा. उमेदवाराकडे रोजगार व स्वयंरोजगार (एम्पलॉयमेंट) कार्यालयाचे ऑनलाईन नोंदणी कार्ड असावे. राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते असलेल्या पासबुकच्या पहिल्या पानाची व आधारकार्डची छायांकीत प्रत सादर करावी.

# केंद्रात व राज्यात तुमचेच सरकार..केंद्राकडून ओबीसी जणगणना करावी

**नागपूर :–** राज्यातील भारतीय जनता पक्ष प्रणित महायुती सरकारने ओबीसी प्रवर्गाची स्वतंत्र जनगणना करण्याबाबतचा ठराव पारीत करुन भारतीय जनता पक्ष प्रणित (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) केंद्र सरकारकडे पाठवुन ओबिसी प्रवर्गाची स्वतंत्र जनगणना करण्यास भाग पाडून राज्यासहीत देशभरातील समस्त ओबीसी प्रवर्गाला न्याय मिळवून देण्याची मागणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, इतर मागासवर्गीय व बहुजन कल्याण मंत्री तसेच माजी इतर मागासवर्गीय व बहुजन कल्याण मंत्री व इतर आमदारांना ओबीसी नेत्या व राष्ट्रवादी काँग्रेस श. प प्रदेश सरचिटनीस डॉ.ऍड. अंजली साळवे यांनी केली.

केंद्र सरकारचा २०१९ ला मजनगणना २०२१फ चा कार्यक्रम जाहीर झाला, त्याच्या नमुना प्रश्नावलीमध्ये ओबीसीचा स्वतंत्र कॉलम अंतर्भूत करुन ओबीसींची स्वतंत्र जनगणना मागणीसाठी डॉ ऍड अंजली साळवे यांनी पुढाकार घेत उच्च न्यायालयात (नागपूर खंडपीठ) मध्यस्थी अर्ज दाखल करून जनगणना २०२१ ला आव्हान दिले होते, तसेच सर्वोच्च न्यायालयात देखील त्यांचा लढा सुरू असुन जनगणना २०२१ मध्ये ओबीसींची स्वतंत्र जनगणना करण्याची मागणी करित संसदेत हा विषय त्यांनी पोहचविला. याशिवाय, अनेक विधिमंडळ सदस्यांना ओबीसींच्या स्वतंत्र जनगणना ठराव पारित करुन केंद्राकडे रेटून धरण्याच्या विनंतीचे निवेदन देत सन २०२० ला महाराष्ट्र विधिमंडळात ओबीसी जनगणनेचा ठराव पारित करण्यात यश मिळिवले होते.. तसेच सरकार ओबीसीची गणना करा अन्यथा, २०२१ च्या जणगणनेत ओबीसी चा कॉलम नाही तर आमचा जणगणनेत सहभाग नाहीफ अश्या मपाटी लावाफ आंदोलनाच्या प्रणेत्या डॉ ऍड. अंजली साळवे यांनी ओबीसी जनतेबाबत आक्रमक भूमिका घेत या आधी सुद्धा सरकारला निवेदन दिले होते.

कोरोना मुळे जनगणना कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला व जनगणना २०२७ चा कार्यक्रम केंद्राने जाहीर केला त्या संदर्भात आता १ एप्रिल २०२६ पासून जनगणनेचा पहिला टप्पा सुरू होत असून महारजिस्ट्रार व जनगणना आयुक्त केंद्रीय गृहमंत्रालया द्वारे जाहीर झालेल्या प्रश्नावलीत ओबीसींना पुन्हा डावलण्यात आले असल्याची खंत डॉ ऍड साळवे यांनी निवेदनात व्यक्त केली .

संविधानच्या अनु. १६ (४) व ३४० नुसार, तसेच जनगणना कायदा १९४८ नुसार बहुसंख्य ओबीसीची जनगणना अपेक्षीत आहे. जर सरकार जवळ ओबीसीचा आकडाच नाही तर कोणत्या आधारावर या प्रवर्गासाठी सरकारव्दारे योजना आखल्या जातात हा प्रश्न डॉ. ऍड. अंजली साळवे यांनी निवेदनात उपस्थित केला. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांसंदर्भात ओबीसीच्या संख्येबाबत प्रश्न उपस्थित झाले होतेच तसेच ओबीसीच्या इतरही हिताच्या योजना बाबत केन्द व राज्याला या योजनांना राबविण्यासाठी अर्थिक तरतुदीची गरज असल्याने सद्यस्थितीतील ओबीसीची संख्या माहिती असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करत राज्यात व केंद्रात भारतीय जनता पक्ष प्रणित सरकार असल्याने राज्यातील भारतीय जनता पक्ष प्रणित महायुती सरकारने ओबीसी प्रवर्गाची स्वतंत्र जनगणना करण्याबाबतचा ठराव पारीत करुन भारतीय जनता पक्ष प्रणित (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) केंद्र सरकारकडे पाठवुन ओबिसी प्रवर्गाची स्वतंत्र जनगणना करण्यास भाग पाडून राज्यासहीत देशभरातील समस्त ओबीसी प्रवर्गाला न्याय मिळवून देण्याची मागणी डॉ साळवे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, इतर मागासवर्गीय व बहुजन कल्याण मंत्री तसेच माजी इतर मागासवर्गीय व बहुजन कल्याण मंत्री व इतर आमदारांना केली आहे.

# मोहगाव बुज येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

**गोंदिया :–** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा न्यायालय, गोंदिया तसेच ग्रामपंचायत मोहगाव बुज यांच्या संयुक्त विद्यमाने २२ मार्च रोजी मजागतिक जल दिनफ निमित्त विशेष कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मोहगाव बुज येथील ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी ११ वाजता आयोजित या कार्यक्रमात जिल्हा व सत्र न्यायालयाच्या वकील ऍड. कांचन ठाकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जागतिक जल दिनाचे महत्त्व विशद केले. त्यांनी



प्रदूषणमुक्त पाणी आणि हवा मिळणे हा नागरिकांचा अधिकार असल्याचे सांगून नॅशनल लीगल सर्व्हिसेस ऑथॉरिटीच्या (थी) मजागृतीफ आणि मडॉनफ (२०२५) या नवीन योजनांची तसेच सार्वजनिक उपयुक्तता शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पॅनल लॉयर ऍड. एकता गणवीर यांनी जलसंधारण आणि मवॉटर हार्वेस्टिंगफ काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. तसेच त्यांनी महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा

(२००५), पोक्सो कायदा (२०१२), हुंडा प्रतिबंधक कायदा (१९६१) आणि मनाल्सा संवादफ (२०२५) योजनेअंतर्गत अन्न व शिक्षणाच्या अधिकारावर प्रकाश टाकला. याप्रसंगी ग्रामपंचायत मोहगावचे उपसरपंच कमलेश रहांगडाले, इंडियन सोशल वेल्फेअर सोसायटीचे जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर पहले, रेखाबाई पटले यांच्यासह जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी व पी. एल. व्ही. प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपसरपंच कमलेश रहांगडाले यांनी केले तर आभार प्रदर्शन रेखाबाई पटले यांनी मानले. या जनजागृती कार्यक्रमात गावातील ५० ते ६० नागरिकांनी सहभाग घेतला असून, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पडला.

# १० वर्षांहून अधिक कार्यकाळ असलेले राज्यातील जिल्हा बँकांचे संचालक अपात्र

**गोंदिया:–** अधिनियम २०२५ ची अंमलबजावणी करत राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये १० वर्षाहून अधिक काळ संचालक राहिलेल्या व्यक्तींना पुढील निवडणुकीसाठी अपात्र ठरविण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनाने दिले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील अनेक सहकारी बँकांमधील दीर्घकाळ सत्तेत असलेल्या संचालकांना मोठा

**धक्का बसण्याची शक्यता आहे.**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दि. ९ मार्च रोजी सहकार आयुक्त व सहकारी संस्थांचे निबंधक यांना पत्र पाठवून या कायद्याची तत्काळ अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे. केंद्र सरकारने १ ऑगस्ट २०२५ पासून लागू केलेल्या बँकिंग कायदा (सुधारणा) अधिनियमातील तरतुदीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये सलग १०

**बैंकिंग कायदा (सुधारणा)**

वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केलेला संचालक पुढील काळात पदावर राहण्यासाठी अपात्र ठरणार आहे.

**आता राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये ही तरतूद**

लागू



करण्याचे आदेश देण्यात आले असून सहकार विभागाच्या सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी तसेच संबंधित बँकांनी तत्काळ आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाल्याच्या वृत्ताला जिल्हा उपनिबंधक जयसिंग ठाकूर यांनी मलोकमतफशी बोलताना दुजोरा दिला. या निर्णयामुळे अनेक सहकारी बँकांमध्ये दीर्घकाळापासून सत्तेत असलेल्या संचालकांची गच्छंती होण्याची शक्यता व्यक्त होत असून आगामी निवडणुकांमध्ये मोठे राजकीय आणि सहकारी समीकरण बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**आरबीआयची सहमती**

या संदर्भात राज्य शासनाने भारतीय रिझर्व्ह बँकेकडे स्पष्टीकरण मागितले होते. त्यावर आरबीआयने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पाठविलेल्या पत्राद्वारे शासनाच्या भूमिकेशी सहमती दर्शविली. बँकिंग नियमन कायदा १९४२ मधील कलम १०अ (२अ) (आय) आणि कलम ५६ नुसार १ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यानंतर सलग १० वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केलेला संचालक पदावर राहण्यास अपात्र ठरेल, असे आरबीआयने स्पष्ट केले आहे.

## ग्रामपंचायत पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**गोंदिया :–** राज्य निवडणूक आयोगाचे १७ मार्च २०२६ चे पत्रान्वये राज्यातील ग्राम पंचायतीतील सदस्य/थेट सरपंच यांच्या निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त जागांच्या पोटनिवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. त्यानुसार गोंदिया जिल्ह्यातील आठ तालुक्यातील ग्रामपंचायत निहाय एकूण ६९ ग्राम पंचायतीच्या पोटनिवडणूकांसाठी निवडणूक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. ग्रामपंचायत पोटनिवडणूका असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये १७ मार्च २०२६ पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागु राहील.

तहसिलदार यांनी निवडणूकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक ३० मार्च २०२६. नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक ७ एप्रिल २०२६ ते १३ एप्रिल २०२६ (शनिवार व रविवार वगळून), वेळ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत. नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजतापासून छाननी संपेपर्यंत. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत. निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजेनंतर. मतदानाचा दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजेपासून ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत (नक्षलग्रस्त व दुर्गम भागासाठी उदा. गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यासाठी सकाळी ७.३० वाजेपासून ते दुपारी ३ वाजेपर्यंत). मतमोजणी व निकाल घोषित करण्याचा दिनांक २९ एप्रिल २०२६ (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील). जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणूकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक ६ मे २०२६ पर्यंत. असे उपजिल्हाधिकारी (सामान्य) मानसी पाटील यांनी कळिवले आहे.

# जिल्ह्यात मका हमीभाव खरेदी केंद्र सुरू करा



**नवेगावबांध :–** जिल्ह्यात रब्बी हंगामातील मका पीक मोठ्या प्रमाणात बाजारात येण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, शासनाकडून अद्याप हमीभाव खरेदी केंद्र सुरू न झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलच्या वतीने माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार प्रफुल्ल पटेल यांना निवेदन सादर करून तातडीने खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली.



**निवेदन देताना हे पदाधिकारी होते उपस्थित**

**निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे, ओबीसी सेल अध्यक्ष किशोर तरोणे, नगरपंचायत सभापती दानेश साखरे, नगराध्यक्ष शालिक हातझाडे, सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष आर. के. जांभुळकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

निवेदनात नमूद केल्यानुसार, सध्या खुल्या बाजारपेठेत मक्याला केवळ १२०० ते १५०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. याउलट शासनाचा निर्धारित हमीभाव सुमारे २४०० रुपये प्रति क्विंटल आहे. बाजारभाव आणि हमीभाव यात तब्बल ९०० ते १२०० रुपयांची तफावत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

उत्पादन खर्च वाढत असताना अत्यंत कमी दरात मका विकण्याची वेळ आल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. जिल्ह्यातील शेतकरी आधीच विविध नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक संकटांशी झुंज देत आहे. अशा परिस्थितीत हक्काचा हमीभाव न मिळाल्यास शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याची शक्यता आहे.

शासनाने तातडीने हस्तक्षेप करून मका खरेदी केंद्र सुरू केल्यास हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. या निवेदनाची दखल घेत खासदार प्रफुल्ल पटेल यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून मका खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे सकारात्मक आश्वासन दिले आहे.

# महाराजस्व अभियानातून सुशासनाचे नवे पर्व-महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



## तीन महिन्यात गोंदिया येथे नविन भूमी अभिलेख कार्यालय

**गोंदिया:-** समाजातील प्रत्येक नागरिकाला शासकीय सेवा विनाविलंब आणि पारदर्शक पध्दतीने मिळाव्यात यासाठी महसूल विभाग कटिबध्द आहे. छत्रपती शिवाजी महाराज महार-ाजस्व अभियान हे केवळ सरकारी कामकाज नसून सर्वसामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारे सुशासनाचे नवे पर्व आहे, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.यावेळी जमिनीच्या मोजणीच्या कामाचा व्याप लक्षात घेता, येत्या तीन महिन्यात गोंदिया येथे नविन भूमी अभिलेख कार्यालय सुरु करण्यात येणार अशी घोषणा केली.

येथील टी.बी. टोली ग्राउंड कुडवा येथे आयोजित तालुकास्तरीय समाधान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी श्री. बावनकुळे बोलत होते. यावेळी खासदार प्रफुल पटेल, सर्वश्री आमदार विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, जिल्हाधिकारी प्रजित नायर, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, उपवनसंरक्षक पवनकुमार जोंग, सर्वश्री माजी आमदार राजेंद्र जैन, हेमंत पटले, भेरसिंग नागपुरे, नाना पंचबुध्दे मंचावर उपस्थित होते.

सद्यस्थितीत ५०० फुटाचे पट्टे वाटप होत आहे ते येत्या काळात १५०० फुट करण्यात येणार. भविष्यात गोंदिया शहरा-तील नागरिकांचे प्रॉपर्टी कार्ड तयार करण्यात येईल. तुमची प्रॉपर्टी तुमच्या मोबाईलवर दिसून येईल, अशी योजना शासन स्तरावर तयार करण्यात येत आहे. झुडपी जंगल जमीनीबाबत नागरिकांना त्रास होणार नाही असे नियोजन करण्यात येईल. शेतकऱ्यांना धानाची प्रोत्साहन राशी मि ळण्यासाठी शासन स्तरावर प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यातील ज्या रेती घाटांचे लिलाव झाले नाही त्या रेती घाटांचे लिलाव करण्याचा सुध्दा निर्णय घेण्यात येणार असे महसूल मंत्री श्री बावनकुळे यावेळी म्हणाले.

खासदार प्रफुल पटेल म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज महार-ाजस्व अभियानाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या कामाचे निराकरण होत आहे. या समाधान शिबिराच्या माध्यमातून शासनाच्या योजना थेट नागरिकांपर्यंत पोहचत आहेत. गोंदिया व भंडारा हा धान उत्पादक जिल्हा असून पूर्व विदर्भाचा आधार आहे. त्यामुळे शासनाकडून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन राशी देण्यात यावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात "सर्वांसाठी घरे' अंतर्गत २० लाभार्थ्यांना पट्टे वाटप, ५ ब्रास मोफत रेती पासेस, भोगवटदार वर्ग २ चे वर्ग १ प्रमाणपत्राचे वाटप, डिजिटल ७/१२ प्रमाणपत्र वाटप व कृषि यांत्रिकीकरण योजनेंतर्गत शेतीशी निगडीत औजारे यामध्ये ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले असून याम ध्ये १ लाख २५ हजार रुपयाची सबसिडीच्या स्वरुपात लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. यावेळी विविध प्रकारच्या योजनांचे ५० दालन लावण्यात आले होते. या दालना-वरुन पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

प्रास्ताविक जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले. "सर्वांसाठी घरे' अंतर्गत ४१९० पट्टे वाटप करण्यात आले. समाधान शिबिरात ६५४ फेरफार निकाली काढण्यात आले. जिल्ह्यात समाधान शिबिराच्या माध्यमातून आतापर्यंत १३ हजार ९१२ पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) मानसी पाटील, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार तसेच सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषदेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ४० 'टॉवर' वरून वणव्यांवर कंट्रोल

**गोंदिया :-** जिल्ह्यातील जंगलाला लागणाऱ्या आगींवर नियंत्रण राखण्यासाठी वनविभागाने यंदा नियोजन केलेले दिसत आहे. जंगलव्याप्त परिसरात ४० निरीक्षण टॉवर उभारले असून, अग्नीरक्षक जवानांची फौजही सज्ज ठेवली आहे. एवढेच नाही तर वणवा नियंत्रणासाठी सुसज्ज असे १५ कंट्रोल रूमही उभारले आहेत. मागील ५ वर्षातील जिल्ह्यातील वनांना लागलेल्या वनव्यांवर नजर टाकली असता वनांना लागलेल्या आगीच्या घटना सर्वाधिक आहेत. यात हजारो हेक्टर क्षेत्रावरील जंगलाचे नुकसान झाले. त्यामुळे यावर्षी वनवा नियंत्रणासाठी यांत्रिक दृष्टीने सुसज्ज असलेले कंट्रोल रूम उभारण्यावर उपवनसंरक्षक पवनकुमार जोग यांनी लक्ष केंद्रित केले आहे.

या प्रत्येक कंट्रोल रूममध्ये ३ ते ४ अधिकारी नियुक्त केले असून, रोजच्या घडामोडींची नोंद घेण्यासाठी यंत्रणाही कामी लावली आहे. ही यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी अधिकच्या निधीचीही मागणी करण्यात आली आहे. नागरिकांना या कंट्रोल रूमला घटनांची माहिती देता यावी, यासाठी २४ तास सेवा



दिली जाणार असून, संपर्कासाठी एक क्रमांकही जाहीर करण्यात आला आहे.

तेंदूपत्ता संकलनाच्या हंगामात तेंदूच्या पानांचा आकार वाढावा म्हणून कंत्राटदार कृत्रिम वणवे लावत असतात. तेंदूपत्ता संकलन हा जिल्ह्यातील सर्वांत मोठा रोजगार आहे. दरवर्षी या हंगामादरम्यान मोठ्या आकाराची तेंदूपाने मिळिवण्यासाठी जंगलांना विनाकारण आग लावण्यात येते. या प्रचंड वणव्यांमध्ये मौल्यवान वनसंपत्ती व दुर्मीळ पशुपक्षी, सरीसृप आदी जीव नष्ट होतात. वणव्याची घटना घडल्यानंतर त्यात नेमके किती नुकसान झाले, वणवा लावला की लागला, याचा अंदाज घेतला जातो. मात्र ते सारे काही ठोकताळे असतात. नेमके किती नुकसान झाले, हे जाणून घेणारी

### १७५ फायर ब्लोअर मदतीला

**आगींच्या घटनांवर नियंत्रण राखण्यासाठी १७५ फायर ब्लोअरची सध्या व्यवस्था करण्यात आली. ही संख्या पुन्हा वाढविण्यावर भर दिला जाईल. त्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अग्निरक्षकांच्या दलाला योग्य ते प्रशिक्षणही देण्यात आले आहे. गस्त वाढविणे, जाळरेषा तयार करणे आणि वणवे रोखण्यासाठी ग्रामस्तरावर नागरिकांशी समन्वय राखून जनजागृतीचे काम त्यांना करावे लागणार.**

स्वतंत्र अशी यंत्रणा वनखात्याकडे नाही. त्यामुळे प्रत्यक्ष जंगलात काम करणारे कर्मचारी सांगतील, तो आकडा गृहीत धरला जातो. त्याम ुळे नेमके नुकसान आणि सरकारी आकडेवारीत मोठी तफावत आढळते. मात्र, आता जंललातील आगीवर नियंत्रण मिळिवण्यासाठी वनविभाग सज्ज झाला आहे. ४० 'वॉच टॉवर' वरून जंगलातील वणव्यांवर 'कंट्रोल' ठेवला जाणार आहे. यासाठी वनविभागाच्या चमू तैनात करण्यात आले आहेत.

# जिल्ह्यातील जि.प.शिक्षकांची रिक्त ८०२ पदे केव्हा भरणार

**गोंदिया :-** विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमातील सुधारणा विधेयक सादर करण्यात आले. यावेळी अर्जुनी मोरगावचे आ. राजकुमार बडोले यांनी सभागृहाचे लक्ष वेधत जिल्ह्यातील शिक्षकांची रिक्त असलेली ८०२ पदे केव्हा भरणार असा मुद्दा उपस्थित केला.

शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मुलांचे शिक्षण प्रभावित होत आहे. पर्याय म्हणून स्वयंसेवक शिक्षक नेमण्यात आले असले तरी त्यांना तुटपुंजे मानधन दिले जात आहे. यामुळे दर्जेदार शिक्षण देणे कठीण झाले असल्याची बाब शासनाच्या निर्दशनास आणून दिली. तसेच भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ (अ) अंतर्गत आरटीईनुसार खासगी स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये २५ टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि मागास-वर्गीय मुलांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे.तरीही नवीन स्वयंअर्थसहाय्यित शाळांना मान्यता देताना हा नियम का लागू केला जात नाही, असा सवाल आ. राजकुमार बडोले यांनी उपस्थित केला.

### शिक्षण हा प्रत्येकाचा हक्क

**शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार आहे. ग्रामीण भागातील गरीब मुलांना जिल्हा परिषद शाळेत शिक्षकच उपलब्ध नसतील तर स्वयंअर्थसहाय्यित शाळा वाढवताना त्यांचे हक्क अबाधित ठेवणे आवश्यक आहे. यामुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रा-तील असमानता दूर होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आ. बडोले यांनी व्यक्त केली.**

बडोले यांनी सरकारकडे त्रिसूत्री मागण्या केल्या. स्वयंअर्थसहाय्यित शाळांना मान्यता देताना २५ टक्के जागा ईडब्ल्यूएस आणि मागासवर्गीय मुलांसाठी राखीव ठेवाव्यात. अनुच्छेद २१ (अ) आणि आरटीई कायद्याचा भंग होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी आणि ग्रामीण महाराष्ट्रातील प्रत्येक मुलाला दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शिक्षक भरती तातडीने करावी अशी मागणी केली.




# क्रीडा विभागाच्या नावीन्यपूर्ण योजनेत 'समोसा घोटाळा'

## ४.५ लाखाचे समोसे खाणारे 'ते' प्रशिक्षणार्थी कोण?

**गोंदिया:-** जिल्ह्यातील युवक कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण योजनेत आर्थिक गैरप्रकाराचा संशय व्यक्त केला जात आहे. २०२४-२५ या वर्षात नागपूरच्या अतुल्य शिक्षा फाऊंडेशनने गोंदिया जिल्ह्यात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आरोग्य जनजागृती शिबिरे व कायदेविषयक कार्यशाळा ६० महाविद्यालयांमध्ये घेतल्याचे दाखवत १९ हजार ७४३ विद्यार्थ्यांवर ४५ लाख रुपयांचा खर्च केल्याचा दावा केला. मात्र, माहिती अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांमुळे या दाव्यांवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणातील सर्वांत चर्चेचा मुद्दा म्हणजे प्रशिक्षणार्थींना वाटप केल्याचे दाखवलेले सुमारे साडेचार लाख रुपयांचे मसमोसे.फ

सादर बिलानुसार साकोली येथील ओम गणेशाय नमः कॅटर्सकडून १८ हजार प्लेट समोसे, प्रति प्लेट २५ रुपये दराने विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आल्याचे दाखविण्यात आले. मात्र, हे समोसे प्रत्यक्षात कोणत्या महाविद्यालयांमध्ये व किती विद्यार्थ्यांना वाटप झाले, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने संशय गडद झाला आहे. अतुल्य शिक्षा फाऊंडेशनने जिल्हा क्रीडा विभागाला प्रशिक्षण घेतलेल्या महाविद्यालयांची यादी सादर केली आहे. परंतु यादीतील काही नामांकित महाविद्यालयांकडून माहिती घेतली असता, संबंधित कार्यशाळा किंवा शिबिरे आयोजितच झाली नसल्याची बाब माहिती अधिकारातून समोर आली.

प्रस्तावानुसार, कार्यशाळेत विद्यार्थ्यांची नोंदणी, चहा-नाश्ता, दुपारचे जेवण, विषयतज्ज्ञांची चार सत्रे, विद्यार्थ्यांचे अभिप्राय आणि प्रमाणपत्र वितरण अशी संपूर्ण प्रक्रिया अपेक्षित होती. मात्र, कोणत्याही ठिकाणी असा कार्यक्रम झाल्याचे आढळत नसल्याचे समोर आल. याशिवाय, १० वी, १२ वी व पदवीनंतर काय? या करिअर मार्गदर्शन पुस्तकाचे १६ हजार विद्यार्थ्यांना वितरण केल्याचे दाखवून ४८ लाख रुपयांचा खर्च दाखविण्यात आल्याचा आरोप आहे. पण याबाबत प्रकाशकाचे बयाण नोंदविले किंवा कसे हे अद्याप स्पष्ट झाले नाही. तसेच प्रत्येक तालुक्यातील २०० विद्यार्थी असे एकूण १६०० विद्यार्थ्यांना दोन महिन्यांचे प्रत्येकी २००० रुपयाचे ऑनलाईन प्रशिक्षण दिल्याचे दाखवत ३२ लाख रुपयांचा खर्च दाखविण्यात आल्याचेही कागदपत्रांमध्ये नमूद आहे.



### विविध कृषी पुरस्कारासाठी ऑनलाईन संगणक प्रणाली सुरु

**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्य-ोग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. ज्यामध्ये दरवर्षी शेती व पुरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो.

यामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. सदर पुरस्कार महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या हस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानीत करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आ-लेली आहे.

# प्रकल्पग्रस्तांना प्रमाणपत्रे मिळाली पण नोकरी मिळेना !

**गोरेगाव:-** तालुक्यातील पिंडकेपार, पाथरी आणि कटंगी या गावांतील शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे या भागातील बहुतांश आदिवासी शेतकरी पूर्णपणे भूमिहीन झाले आहेत. शासनाने या प्रकल्पग्रस्तांना सरकारी नोकरीत प्राधान्य मिळावे, यासाठी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रे तर दिली. परंतु दशके उलटूनही अद्यापही नोकरीचे स्वप्न अधुरेच राहिले आहे. परिणामी, हक्काची शेतीही गेली आणि हक्काची नोकरीही मिळाली नाही, अशा दुहेरी संकटात हे प्रकल्पग्रस्त कुटुंब अडकले आहेत. आता या प्रकल्पग्रस्तांसमोर एक अत्यंत नवीन आणि गंभीर सामाजिक समस्या उभी राहिली आहे. जमिनी नसल्यामुळे या भागातील विवाहयोग्य तरुणांचे विवाह जमण्यात मोठ्या अडचणी येत आहेत, ज्यामुळे संपूर्ण तरुण पिढी नैराश्यात ढकलली जात आहे.


कटंगी प्रकल्पासाठी सन १९९६-९७मध्ये जमिनी अधिग्रहित केल्या गेल्या. तेव्हा शासनाकडून प्रति एकर केवळ ४० ते ५० हजार रुपये इतका अल्प मोबदला देण्यात आला होता. त्यावेळी मिळालेली ही रक्कम इतकी कमी होती की, त्या पैशात दुसरीकडे साधी एक आर जमीन खर-ेदी करणेही अशक्य झाले. यामुळे हे शेतकरी कायमचे भूमिहीन झाले. जेव्हा वधू पक्षाकडून विवाहासाठी मुलांकडे विचारणा केली जाते, तेव्हा प्रामुख्याने शेती आणि जमिनीबद्दल सविस्तर विचारले जाते. मात्र, प्रकल्पामुळे शेती अधिग्रहित झाल्याने तरुण आता भूमिहीन झाले आहेत, हे सत्य समोर येताच ठरलेली लग्ने मोडली जात आहेत.

### अनुकंपा तत्वावर नोकरी द्या

**एकीकडे शासन आदिवासींच्या जमिनीचे संरक्षण करण्याचे दावे करते, तर दुसरीकडे प्रकल्पाच्या नावाखाली याच आदिवासींची १०० टक्के जमीन अधिग्रहित करून त्यांना देशोधडीला लावले गेले आहे, असा संताप प्रकल्पग्रस्त व्यक्त करत आहेत. आता उर्वरित प्रकल्पग्रस्तांना आणि त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर तातडीने सरकारी विभागांत नोकऱ्या द्याव्यात, अशी आग्रही मागणी जोर धरत आहे.**

**प्रकल्पग्रस्तांना शून्य टक्के व्याजदराने ५० लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून ते स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतील. तसेच शासनाकडून उभारण्यात येणाऱ्या दुकान संकुलांमध्ये प्रकल्पग्रस्तांना मोफत दुकाने देण्यात यावीत, जेणेकरून त्यांना कायमस्वरूपी रोजगार मिळू शकेल।**
**- भरत घासले, प्रकल्पग्रस्त, पिंडकेपार**

विशेष म्हणजे, ज्या प्रकल्पग्रस्तांना नोकरीसाठी प्रमाणपत्रे दिली गेली,



त्यातील अनेकांचा नोकरीच्या प्रतीक्षे-तच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर अनेक तरुणांचे वय आता सरकारी नोकरीच्या मर्यादेबाहेर जात आहे. मुलाकडे शेती नाही आणि सरकारी नोकरीही नाही, मग उदरनिर्वाह कसा होणार? या एका प्रश्नामुळे अनेक स्थळे चालून येऊनही शेवटच्या क्षणी नाकारली जात आहेत.

# अभ्यास दौऱ्याच्या नावावर मोजक्या जि.प.सदस्यांनी कुटूंबियासह लुटला केरळचा आनंद!






**खेमेद्र कटरे**

**गोंदिया:-**जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प घाईघाईत सादर करुन सहलीला जाण्यासाठी सज्ज जिल्हा परिषदेच्या पदाधिकार्यांना जिल्हा परिषदेच्या उत्पन्न वाढीसाठी काही करता आले नसले तरी जिल्हानिधी व महिला बालविकास विभागाच्या ५ लाखाच्या निधीतून सहकुटुंब मौजमस्ती करण्याकरीता अभ्यास सहलीच्या नावावर एक आठवड्यापुर्वी केरळ गाठले.केरळमधील अभ्यास करुन आता सदस्य परतीला निघ-ाले असून आपल्या जिल्हा परिषदेच्या मतदारसंघात केलेल्या अभ्यासाचे प्रात्यक्षिक विकासकामातून कसे करतात,हे बघायचे आहे.

विशेष म्हणजे महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६० ची पुर्णत वाट लावत जिल्हा परिषद अध्यक्षांनी सभागृहाचे सदस्य नसलेल्यांनाही आपल्या सोबत नेल्याने सभागृहाचे सदस्य नसलेल्या पतीदेवांचे शासकीय योजनेतून चांगलेच फावले आहे.विशेष म्हणजे महिला बालविकास विभागाचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या अधिकृत माहितीनुसार महिला व बालविकास विभागाच्या समितीमध्ये सदस्य असलेल्या सदस्यांचीच सहल केरळला अभ्यासाकरीता गेली आहे.तर पशुसवंर्धन,कृषी,आरोग्य व शिक्षण विभागाच्या सहलीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निधी देण्यासच नकार दिला,मग बाकीचे विषय समितीचे सदस्य हे कुठल्या नियमाने अभ्यासाला केरळला गेले,हा पंचायत राज व्यवस्थेत संशोधनाचा विषय ठरला आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेतील अध्यक्षसह(माजी जि.प.अध्यक्ष,जि.प.उपाध्यक्ष,माजी समाजकल्याण,बांधकाम सभापती,विद्यमान अर्थ व बांधकाम सभापतीसह काही जि.प.सदस्य वगळता) जिल्हा परिषद सदस्यांनी मात्र अभ्यास दौऱ्याच्या नावावर शासकीय निधीतून केरळमधील समुद्राचा व चायबगिच्याचा अभ्यास सहलीच्या माध्यमातून केला आहे.गेल्या २५ वर्षाचा हिशोब घेतल्यास अभ्यास दौऱ्यानिमित्त जिल्हा परिषद सदस्यांच्या सह-लीवर कोट्यवधी रुपया खर्च झा-लेला आहे.परंतु एकाही अभ्यास दौऱ्याचा अहवाल जिल्हा परिषद सादर करु शकलेला नाही व कधीच बघावयासही मिळालेला नाही.त्यातच महाराष्ट्राबाहेर अभ्यास सहल घेऊन जायचे असल्यास विभागीय आयुक्त व राज्यसरकारची परवानगी घ्यावी ला-गते,मात्र संबधित विभागाकडे माहिती घेतली असता विभागीय आयुक्ताकडून परवानगीचा कुठेच पत्रव्यवहार झाले नसल्याचे कळले.तर महिला बालकल्याण विभागाला केंद्रपुरस्कृत योजनेच्या नावावर जरी राज्याबाहेर जायची परवानगी असली तरी महिला सदस्यांशिवाय इतरांना त्या सहलीत जाता येत नाही,मग इतरांचे नियोजन कसे होते हा प्रश्न सुध्दा उपस्थित झालेला आहे.

आम्ही समाजसेवेकरीता जिल्हा परिषदेत जाऊन काम करणार असे सांगणारे काही मोजक्या महिला सदस्यांचे पतीदेव कामाचे कंत्राटाचे पत्र हातात मिळावे याकरीता पदाधिकारी कक्षात फिरतांना उघड्या डोळ्यांनी अनेकदा बघावयास मिळाले,त्यापैकी अनेकांना यावेळी केरळ यात्रेतही सहभागी होता आले.यावरुन महिला आरक्षणाने आदरणीय महिला सदस्या जरी निवडून जि.प.च्या सभागृहात पोचल्या असल्या तरी त्या पतिदेवांच्या समोर अबलाच ठरल्या म्हणायला वाव आहे.

असो अभ्यासाच्या निमित्त-ाने केरळ राज्यातील अनेक शहरात जाऊन परतीवर असलेले किती सदस्य केलेल्या अभ्यासावर येत्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत आपला अहवाल सादर करुन तो प्रसारमाध्यम ापर्यंत पोचवतात,याकडेही लक्ष लागून आहे.अगदी सर्वच महिला स्वत:ची कामे स्वत: करत नाही,यामागे पुरुषी मानसिकता जबाबदार आहे.आरक्षण असल्यामुळे आई, पत्नी,बहिणीला प्राधान्य दिले जाते.यात आता एकच म्हणेल या गोष्टींना नकारात्मकतेने पाहू नये, पाच वर्षाची पाहुणी आली आणि गेली असे होऊ नये, स्वत: शिकत तिने स्वत: राजकारण करायला हवे.

परंतु गोंदिया जिल्हा परिषदेच्या आजपर्यंतच्या काळाकडे बघितल्यास मोजक्याच काही महिला जिल्हा परिषद सदस्या ज्यांनी स्वतःचे अस्तित्व दाखवून दिले,त्यांच्या कार्याचा व भूमिकेचा नक्कीच गौरव करायला हरकत नाही.परंतु काही महिला सदस्य या आपल्या अधिकाराचे हनन स्वतःच आपल्या पतीदेवाला अधिकार देऊन करीत असल्याचे चित्रही उघड्या डोळ्यांनी बघायला मिळत आहे,अशाच महिला सदस्यांचे पतीदेव मात्र जिल्हा परिषदेत कुठल्याच पदावर नसतांना शासकीय निधीतून गेलेल्या सहलीवर मात्र मौज करायला जाऊन शासकीय नियमांची तर खिल्ली उडवितच आहेत,सोबतच त्या महिला सदस्याच्या अधिकारावर सुध्दा घाला घालतायेत अशी म्हणायची वेळ आली आहे.

काही निवडक महिला सदस्यांचे पतीदेव तर जिल्हा परिषदेतील अधिकारी यांच्यापासून चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यावर सुध्दा तोरा दाखविण्याचा प्रयत्न ते सुध्दा विविध कामाच्या कंत्राटाकरीता म्हणा की त्या कामाची (प्रमा) प्रशासकीय मान्यतेचे पत्र मिळावे याकरीता करतांना दिसून येतात.त्यांच्यापेक्षा तर स्वबळावर स्वतःचे अस्तित्व प्रशासकीय यंत्रणेसमोर दाखविणाऱ्याही महिला जि.प.सदस्या कितीतरी पटीने चांगल्या म्हणता येईल.

त्या सहलीला किती सदस्य गेले,त्यांचे किती नातेवाईक सोबत गेले,कुठल्या कंपनीला कंत्राट देण्यात आले.त्याकरीता कुठल्या वृत्तपत्रात निविदा रोस्टरनुसार देण्यात आली याचा आढावा घेण्याकरीता जेव्हा जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागात फेरफटका मारण्याची वेळ आली.तर तिथे काय कुणीही कर्मचारी बोलायला तयारच नाही.जेव्हा की आजपर्यंतच्या सर्व सहलीचे नियोजन महिला बालकल्याण विभागातूनच झा-लेले असताना यावेळी मात्र आम्ही ते नव्हेचची भूमिका अधिकारी का सादर करीत आहेत,हे कळेनासे झाले.

अभ्यास सहल परराज्यात नेण्यासाठी व सर्व सदस्य एकाचवेळी जात असतील तर विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक असल्याचे चौकशी दरम्यान समोर आले.यासंदर्भात अति.म ुकाअ तानाजी लोखंडे यांना विचारणा केले असता त्यांनी मला याबाबत माहिती नाही.संबधित विभागाचे विभागप्रमुखाकंडून ही कारवाई होत असल्याने त्यांच्याकडूनच कळेल असे सांगितले.तर ज्या सामान्य प्रशासन विभागातून मुख्य पत्रव्यवहार केला जातो,त्या विभागाच्या अधिक्षकांना विचारणा केल्यावर असा कुठलाच पत्र आजपर्यंत तरी गेले नसल्याचे सांगितले.सोबतच महिला बालकल्याण विभागातूनही अशाप्रकारचा कुठला पत्र विभागीय आयुक्ताकडे करण्यात आले काय यासंदर्भात प्रभारी महिला बालकल्याण अधिकारी यांना विच-ारणा करण्याकरीता संपर्क केले असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

### एका विशेष कर्मचाऱ्यास संधी का?

गोंदिया जिल्हा परिषदेत अनेकदा कुठलेही कार्यक्रम असो की सहल एका विशेष महिला कर्मचाऱ्यास संधी का दिली जाते,यावर आता कर्मचारी वर्गात चर्चा होतांना दिसून येत आहे.विशेष म्हणजे मुख्यालयात अनेक महिला कर्मचारी असतांना त्यांच्यातही अनेक सुप्त गुण असतांना त्यांना संधी न देता नेहमीच त्यांना डावलून एकाच महिला कर्मचाऱ्यालाच संधी देणं योग्य नसल्याचे हलक्या आवाजात कर्मचारी बोलू लागले आहेत.त्यातच अध्यक्षांचे स्वीय सहाय्यकांना जाण्याची परवानगी तर इतर सभापतींच्या स्वीय सहाय्यकांवर अन्याय का हा सुध्दा सुर समोर येऊ लागला आहे.